आशियातील सर्वात मोठ्या स्वयंसेवी ग्राहक संघटनेचे मुखपत्र

RNI NO. MAHBIL/2011/39044

वर्ष १४ | अंक ८ | नोव्हेंबर २०२५ | मूल्य ₹५/-

# Grahak Tituka Melwawa
# ग्राहक तितुका मेळवावा

मुंबई ग्राहक पंचायत
ग्राहक हिताय ग्राहक सुखाय

मुंबई ग्राहक पंचायत MGP 50 सुवर्ण महोत्सवी वर्ष २०२४-२०२५

MEMBER OF CONSUMERS INTERNATIONAL

जागो ग्राहक जागो



## बालग्राहक सजग तर बदलेल जग !

# १०० कोटींची MGP:
# आनंद, अभिमान, अभिनंदन!

**– ॲड. शिरीष देशपांडे, कार्याध्यक्ष**

मा. बिंदुमाधव जोशी, सुधीर फडके (बाबूजी) आणि मधुकरराव मंत्री या त्रिमुर्तीने १९७५ मध्ये स्थापन केलेली स्वयंसेवी ग्राहक संस्था ५० वर्षात १०० कोटींचा वार्षिक व्यवहार करते, हे यंदाच्या आर्थिक ताळेबंदात उमटलेले चित्र विलोभनीय आहे. जागतिक ग्राहक चळवळीतील हा एक मोठा चमत्कारच!

आपल्या संस्थेची तीन प्रमुख अंगे आहेत:

१) ग्राहक संघांद्वारे जीवनावश्यक वस्तूंचे मासिक वितरण! सहा वितरण केंद्रांद्वारे अडीच हजार ग्राहक संघांद्वारे २८ हजार कुटुंबाना १०० हून अधिक वस्तूंचे दरमहा वितरण.

२) ग्राहक पंचायत पेठांद्वारे वार्षिक खरेदीचे/विक्रीचे आयोजन होते.

३) ग्राहक चळवळ- म्हणजेच ग्राहकांचे संघटन करणे, ग्राहक प्रबोधनासाठी पुस्तके, मासिके प्रकाशन, स्तंभ लेखनाद्वारे ग्राहक जागृती, ग्राहक शिक्षण, ग्राहक संरक्षण मोहिमा, तक्रार मार्गदर्शन, न्यायालयीन लढे, ग्राहकाभिमुख धोरणे आणि कायद्यांसाठी पाठपुरावा करणे.

२०२४-२५ या आर्थिक वर्षात जीवनावश्यक मासिक वाटप व्यवस्थेची वार्षिक उलाढाल ८१.३६ कोटी रुपयांची झाली, तर पंचायत पेठांची वार्षिक उलाढाल ही १७.१६ कोटी रुपयांची झाली. चळवळीसाठी सदस्य शुल्क, प्रकाशने, देणग्या इ. द्वारे १.१५ कोटींची वार्षिक उलाढाल झाली. त्यामुळे एकूण आर्थिक उलाढाल ९९.६७ कोटींची म्हणजेच जवळजवळ शंभर कोटींची झाली, असे म्हणायला हरकत नाही.

कार्याध्यक्ष या नात्याने मी माझ्या सर्व सहकाऱ्यांचे आभार मानतो आणि अभिनंदन करतो. मुंबई, ठाणे, पालघर, वसई, रायगड आणि पुणे वितरण समिती सदस्यांचेही आभार मानून अभिनंदन करतो. गेल्या काही वर्षांत बाजारात तीव्र झालेल्या स्पर्धेला तोंड देत पंचायत पेठांचे, व्यावसायिकांना लाजवेल असे, आयोजन करून पंचायत पेठांना बहर आणल्याबद्दल संपूर्ण पंचायत पेठ समितीचे विशेष अभिनंदन. तसेच ग्राहक शिक्षण, ग्राहक संरक्षण, संघटन, पर्यावरण विभाग तसेच सर्व भौगोलिक विभागातील प्रत्येक कार्यकर्त्यांचे या मोठ्या यशात योगदान आहे.

कामाचा एक पैसाही मोबदला न घेणाऱ्या संस्थेच्या असंख्य सेवाभावी कार्यकर्त्यांमुळे आणि जवळजवळ ३० हजार सदस्य संख्या असल्यामुळे मुंबई ग्राहक पंचायत ही आज आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर असलेली आशियातीलच नव्हे तर, माझ्या उपलब्ध माहितीनुसार, जगातील सर्वात मोठी स्वयंसेवी ग्राहक संस्था बनली आहे. मुंबई ग्राहक पंचायतीच्या प्रत्येक सदस्यासाठी, प्रत्येक कार्यकर्त्यासाठी, प्रत्येक अधिकारी, कर्मचारी, कामगारासाठी ही अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे.

१०० कोटींची व्यावसायिक कंपनी चालवण्यापेक्षा १०० कोटींची स्वयंसेवी ग्राहक संस्था चालवणे हे केव्हाही जास्त आव्हानात्मक असते. आजवर तरी आपण या आव्हानाचा यशस्वी मुकाबला करत आलो आहोत. भविष्यातही अनेक आव्हाने असतील त्याला सामोरे जाण्यासाठी संस्थेतील नवी पिढी नव्या जोमाने, नव्या उत्साहाने तयार होत आहे, हे या संस्थेचे भाग्य आहे.




**रविवार २६ ऑक्टोबरला झालेल्या मुंबई ग्राहक पंचायतीच्या ४४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत संस्थेच्या कार्यवाह अनिता खानोलकर, कार्योपाध्यक्ष प्रभाकर गवाणे, कार्याध्यक्ष शिरीष देशपांडे, अध्यक्ष डॉ. बाळ फोंडके, कार्योपाध्यक्ष अनुराधा देशपांडे, खजिनदार रविंद्र सहस्रबुद्धे**

RNI No. MAHBIL/2011/39044

## मुंबई ग्राहक पंचायत

**विश्वस्त मंडळ**
डॉ. बाळ फोंडके
अनुराधा गोरे
ललिता कुलकर्णी
अनुराधा नरसाळे
संजीव मंत्री

**अध्यक्ष**
डॉ. बाळ फोंडके

**उपाध्यक्ष**
अनुराधा गोरे

**कार्यकारी मंडळ**
ॲड. शिरीष देशपांडे (कार्याध्यक्ष, स्वीकृत)
अनुराधा देशपांडे (कार्योपाध्यक्ष)
प्रभाकर गवाणे (कार्योपाध्यक्ष)
अनिता खानोलकर (कार्यवाह, स्वीकृत)
रविंद्र सहस्रबुद्धे (खजिनदार)

**कार्यकारिणी सभासद**
ज्योती मोडक
शीला देवळेकर
राजेंद्र राणे
शुभदा चौकर
अनघा आचरेकर
मंगला गाडगीळ
शर्मिला रानडे
आलोक हर्डीकर
विवेक केळकर
प्रकाश पाटील
उदय पिंगळे (स्वीकृत)
नेहा जोशी
कल्पिता रानडे
विनायक सोमण (स्वीकृत)
सुधीर तावरे

**निमंत्रित**
संघटन विभाग प्रमुख

या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी संपादक/संघटना सहमत असतीलच असे नाही.

# ग्राहक तितुका मेळवावा

नोव्हेंबर २०२५ | कार्तिक - मार्गशीर्ष १९४७

## अनुक्रमणिका

**संपादकीय** ०४
धूर आणि धुरळा

पुनर्विकास प्रकल्पास उपनिबंधकाचे ‘ना हरकत प्रमाणपत्र’ अनावश्यक ०५

मंत्री उदयजी सामंत यांचे गौरवोद्गार ०६

स्त्री शक्तीचा सन्मान... एक अनोखा पुरस्कार सोहळा! ०७

बालग्राहक - खेळण्यांची योग्य निवड ०९

बाबा नापास १०

काय काय स्वस्त झालंय, माहितीये का? ११

पोलिस स्थानकात रक्षाबंधन १३

मालाड विभागात मुलांसाठी उपक्रम १३

१२०० कापडी पिशव्यांचे वाटप १३

ग्राहक पंचायत पेठ ठाणे: एक उत्साही सोहळा १४

विद्यानिधी शाळेत पर्यावरणाचा वसा १४

**‘बँकिंग’बद्दल बोलूया** १८
धनादेश वटण्यासाठी नवीन पध्दती

पर्यावरणप्रिय घरगुती गणेश स्पर्धा १९

**वाचू आनंदे** १९
‘जर-तर’च्या गोष्टी भाग-१

स्वयंपाकाची भांडी आणि आजीची आठवण !! २०

पर्यटनस्थळावरील उपकर २२

ऑनलाईन गेमिंगला कायद्याची वेसण २२

आम्ही सजग बाल ग्राहक! २३

**संपादक** शुभदा चौकर
**संपादकीय साहाय्य** नेहा जोशी
**सल्लागार** ॲड. शिरीष देशपांडे, वसुंधरा देवधर
**मुखपृष्ठ** राजेंद्र राणे
**अक्षरजुळणी व कला दिग्दर्शन** रिद्धी नि. पाटील, तन्वी गोखले
**मुद्रण** इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई

Printed & Published by **SHUBHADA CHAUKAR** on behalf of **Mumbai Grahak Panchayat**, Printed at India Printing Works, 42 G. D. Ambekar Marg, Wadala, Mumbai – 400 031 and Published at Mumbai Grahak Panchayat, Grahak Bhawan, Sant Dnyaneshwar Marg, JVPD Scheme, Juhu, Vile Parle (West), Mumbai – 400 056. Ph.: 022-4750 8541/42 (Office).
• Email : mpanchayat@gmail.com • Vitaran Email : mgpvitaran@yahoo.co.in
• Website : **https//www.mymgp.org** • Editor : **Shubhada Chaukar**

संपादकीय

# धूर आणि धुरळा

ऐन दिवाळीतील एका दृश्याने मन व्यथित होते. फटाक्यांमुळे प्रत्येक सोसायटीत, वस्तीत निर्माण होणाऱ्या कचऱ्याच्या अवशेषांनी भरलेले आवार! दिवसेंदिवस हा कचरा वाढत असल्याचे जाणवत आहे. ज्या मोठ्या सणासाठी आपण आपली घरे आणि परिसर स्वच्छ करतो, घराबाहेर सुंदर रांगोळ्या रेखाटतो, त्याच सणाच्या वेळी प्रदूषण निर्माण करणारे फटाके उडवले जातात, शिवाय त्या फटाक्यांचा कचरासुद्धा तिथेच टाकून हे उन्मादक पसार होतात, हा विरोधाभास मन विषण्ण करतो.

फटाक्यांमुळे हवेचे, प्रकाशाचे आणि आवाजाचे प्रदूषण होते. त्यामुळे फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याचे आवाहन आपण मुंबई ग्राहक पंचायतीतर्फे शाळांमध्ये जाऊन करत असतो. मात्र हे प्रयत्न अजून फारच तोकडे आहेत, याची प्रचिती यंदाच्या दिवाळीत सर्वांना पुरेपूर आली असेल.

दिवाळीच्या आधी आपल्या शिक्षण विभागातील कार्यकर्त्यांनी काही शाळांमध्ये जाऊन मुलांना फटाके का वाजवायचे नाहीत, हे नीट समजावून सांगितले. काही शहाण्या मुलांनी तसा निश्चय केला असणार. फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याची प्रतिज्ञासुद्धा काही मुलांनी घेतली, याचे दाखले आपल्याकडे आहेत.

यंदा म्हणे भारतीयांनी फटाक्यांवर तब्बल ७००० कोटी रुपयांचा चुराडा केला. एकीकडे शहरांतील हवेच्या प्रदूषणाची पातळी चिंताजनक म्हणावी इतकी वाढलेली असताना, त्यावरचा उपायही सरकारच करेल अशा भरवशावर कसे राहू शकतो? जबाबदार नागरिक म्हणून आपण आपली कर्तव्ये विसरत चाललो आहोत का?

फटाक्यांमुळे हवेत विषारी वायू पसरतात. शिवाय त्याच्या कचऱ्याचा धुरळा, त्यामुळे अनेकांना श्वसनाच्या समस्या होत आहेत. फटाक्यांचा अतीव आवाज कानाला वेदनादायक ठरतो. हवेतले विषारी धूर डोळ्यांनाही त्रासदायक ठरतात.

पर्यावरण हा विषय आता शालेय व महाविद्यालयीन अभ्यासक्रमात समाविष्ट झालेला आहे. त्याची थीअरी पाठ करून त्या विषयात उत्तम गुण मिळवणारी अनेक मुले प्रत्यक्ष जीवनात मात्र या विषयाची पायमल्ली करत आहेत. आधीच्या पिढीत हवेचे प्रदूषण ही समस्या इतकी तीव्र झालेली नव्हती. त्यामुळे फटाक्यांना इतका विरोध नव्हता. आपल्या मुंबई ग्राहक पंचायतीच्या सुरुवातीच्या काही वर्षांत विभागीय वाटपांमध्ये फटाके असत. आपले कार्यकर्ते घाऊक बाजारातून फटाके खूपच स्वस्तात आणून ते विभागातील सभासदांना माफक दरात देऊ करत. या उपक्रमाचे खूप कौतुकही होत असे. कारण तेव्हा दिवाळी आणि फटाके हे एक समीकरणच होते आनंद साजरा करण्याचा तो तेव्हा शिष्टसंमत मार्ग होता. त्यामुळे माझ्यासह आपल्या सभासदांपैकी अनेकांनी त्यांच्या लहानपणी फटाके उडवलेले असणार. फुलबाजा, अनार, भुईचक्र, लवंगी, सुतळी, आपटी बार, लक्ष्मी बार, ॲटम बॉम्ब, रॉकेट अशा अनेक फटाक्यांच्या कितीतरी रोचक आठवणी आपल्यापाशी असतील.

पण आता काळ बदलला आहे. पर्यावरणाचा प्रश्न फारच गंभीर झालेला आहे. अशावेळी त्या बदलला सामोरे जाण्यासाठी आपण आपल्या प्रथा बदलणार नाही का? मध्यमवर्गीय समाजाच्या खिशात पैसा खुळखुळू लागला, आपल्या श्रीमंतीचे प्रदर्शन करण्याची अहमहमिका सुरू झाली, तशी फटाके संस्कृती अधिकच फोफावली. फटाक्यांमुळे होणाऱ्या प्रदूषणाबद्दल सर्वत्र प्रचार, प्रसार होत असूनही त्याकडे कानाडोळा करण्याची एक प्रकारची बेपर्वाईसुद्धा समाजात पसरली. मला काय त्याचे, हा बेफिकीरपणा समाजात वाढीला लागला.



**अ.भि. गोरेगावकर शाळेतील मुले 'मी फटाके उडवणार नाही' अशी शपथ घेताना.**

आपण मुंबई ग्राहक पंचायतीचे सभासद म्हणून आपल्याला शाश्वत जीवनशैलीचे पाईक मानतो. आपले वितरणाचे मॉडेल कसे पर्यावरणपूरक आहे, याचा सार्थ अभिमान बाळगतो. अनेक बारीक, छोट्या कृतींमधून आपण पर्यावरण रक्षणाचा वसा उचलत आहोत. आपल्या सर्व सभासदांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी स्वतः फटाके न उडवण्याचा निश्चय केला आणि आपल्या आसपासच्या काही जणांमध्ये जरी हा समायोजित बदल घडवून आणण्यात पुढाकार घेतला, तरी आपण या समाजात किंचित बदल घडवून आणू शकतो. सण, उत्सव यांतील उत्साह आणि उन्माद यातला फरक आपण जाणतो. ती जाण कृतीत आणण्याचा संकल्प करण्याची वेळ आलेली आहे.

या महिन्यात १४ नोव्हेंबर बालदिन आहे, त्यानिमित्त आपल्या बालकांना त्यांच्या भविष्यात चांगले हवापाणी मिळण्यासाठी तरी आज हे करणे क्रमप्राप्त आहे!

**– शुभदा चौकर**

# पुनर्विकास प्रकल्पास उपनिबंधकाचे 'ना हरकत प्रमाणपत्र' अनावश्यक

– **ॲड. शिरीष वा. देशपांडे, कार्याध्यक्ष**

पुनर्विकास प्रक्रियेत गृह संस्थांना आणि विकासकांना लुटणाऱ्या उपनिबंधकांना उच्च न्यायालयाचा लगाम लावणारा निर्णय न्यायालयाने दिला आहे. त्यामुळे ७९ (अ) अंतर्गत मुरलेल्या भ्रष्टाचाराला उच्च न्यायालयामुले सुरुंग लागणार आहे.

पुनर्विकासासाठी कलम ७९ (अ) अंतर्गत विकासक निवड प्रक्रियेत उपनिबंधकाचे 'ना हरकत प्रमाण पत्र' (NOC) आवश्यक नसल्याचा, किंबहुना ते बेकायदेशीर असल्याचा सुस्पष्ट निर्वाळा मुंबई उच्च न्यायालयाने नुकताच एका निर्णयाद्वारे दिला आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यातील कलम ७९ (अ) अंतर्गत ४ जुलै २०१९ च्या शासन निर्णयात निबंधक वा उपनिबंधकांना विकासक निवडीबाबत गृह संस्थांना 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्याचे कोणतेही अधिकार दिलेले नसल्याचे स्पष्ट करून निबंधक अशाप्रकारे आपल्याच अधिकारात या प्रक्रियेत असा एक नवा स्तर निर्माण करू शकत नाहीत, असे निरीक्षण उच्च न्यायालयाचे मा. न्या. अमित बोरकर यांनी आपल्या १७ ऑक्टोबर २०२५ च्या या निर्णयात नोंदवले आहे. (बी. फर्नांडिस आणि इतर विरुध्द उपनिबंधक H (West) Ward आणि इतर)

उच्च न्यायालयाने यानिमित्ताने गृह-संस्थांचे अधिकार आणि निबंधक, उप-निबंधकांचे अधिकार याबाबत सविस्तर ऊहापोह केला आहे. निबंधकांचे व उपनिबंधकांचे अधिकार हे पर्यविक्षण स्वरुपाचे (supervisory) आणि म्हणूनच मर्यादित स्वरुपाचे असल्याचे स्पष्ट करत विकासक निवडीचे संपूर्ण अधिकार हे गृह-संस्थेच्या सर्वसाधारण सभेचे आहेत, हे अधोरेखित केले आहे.

विशेष सर्वसाधारण सभेत विकासक निवड प्रक्रिया योग्य प्रकारे राबवली जात आहे की नाही, त्यासाठी सभेला आवश्यक ती किमान गणसंख्या आहे की नाही, विकासकाची निवड आणि मतदान प्रक्रिया पारदर्शक आणि मोकळ्या वातावरणात होत आहे की नाही, त्याचे व्हिडिओ रेकॉर्डिंग होते आहे की नाही हे बघणे एवढेच निबंधकाचे काम असल्याचे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. ४ जुलै २०१९ च्या शासन निर्णयात निबंधक अथवा उपनिबंधकांना स्वतःचे स्वेच्छाधिकार वापरण्याचे अथवा 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्याचे वा नाकारण्याचे कोणतेही न्यायिक अधिकार दिलेले नसल्याचे उच्च न्यायालयाने या निर्णयात स्पष्ट केले आहे.

या संपूर्ण विषयाची व्याप्ती आणि गांभीर्य लक्षात घेऊन उच्च न्यायालयाने त्याही पुढे जाऊन या निर्णयाची प्रत सहकार आयुक्तांना आणि सहकार खात्याच्या प्रधान सचिवांना पाठवण्याचे निर्देश दिले असून सहकार आयुक्तांनी एका परिपत्रकाद्वारे उच्च न्यायालयाचा हा निर्णय सर्व निबंधक, उपनिबंधकांना त्वरीत अवगत करून देऊन 'ना हरकत प्रमाणपत्राची' ही चुकीची आणि बेकायदेशीर प्रथा ताबडतोब बंद करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. इतकेच नव्हे तर अशा प्रकारे परिपत्रक काढल्याचे उच्च न्यायालयास ६ नोव्हेंबरपर्यंत पुराव्यासह प्रतिज्ञापत्राद्वारे कळवण्याचे निर्देशही सहकार आयुक्तांना देण्यात आले आहेत.

मुंबई ग्राहक पंचायतीतर्फे आपण या ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत केले आहे. मा. न्या. अमित बोरकर यांच्या या सुस्पष्ट निर्णयामुळे निबंधक व उपनिबंधकांच्या कार्यालयांत सर्वत्र बोकाळलेल्या आणि राजमान्यता मिळालेल्या भ्रष्टाचाराला आळा बसेल अशी आशा आहे.

विकासक निवड प्रक्रियेत अशा प्रकारचे 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्याचे उपनिबंधकांचे दर पत्रक हा खुल्या चर्चेचा विषय झाला होता. हा दर प्रति सदनिका १५ हजार ते ५० हजारांपर्यंत असल्याचे बोलले जात होते. सहकारी संस्थांना अशा प्रकारे पैसे देणे शक्य नसल्याने ही वसुली निवड झालेल्या विकासकाकडून करण्यात येत होती. काही कालांतराने उपनिबंधक कार्यालयांना विकासकाच्या निवडीपर्यंत देखील धीर धरवेना आणि त्यातूनच 'Preferred Developer' अशी एक नवी शक्कल लढवली गेली, जेणेकरून ७९ (अ) अंतर्गत विशेष सर्वसाधारण सभेसाठी उपनिबंधकांचा प्रतिनिधी नेमण्यापूर्वीच हा मोठा आर्थिक व्यवहार 'प्रिफर्ड डेव्हलपर'तर्फे पार पाडला जात होता. आता या 'ना हरकत प्रमाणपत्रा' बरोबरच 'प्रिफर्ड डेव्हलपर'चे जे भूत उभे केले गेले होते, तेही यापुढे गाडले जाईल, अशी आशा आहे.

उच्च न्यायालयाच्या या सुस्पष्ट निर्णयाच्या पार्श्वभूमीवर आपण नारेडको, एमसीएचआय, क्रेडाई यासारख्या विकासकांच्या संघटनांना कळकळीचे आवाहन केले आहे की यापुढे तरी उपनिबंधकांच्या अशा बेकायदेशीर वसुलींना खतपाणी घालू नका. त्या ऐवजी तो पैसा पुनर्विकासातील गृह-संस्था आणि त्यांच्या सदस्यांना देऊन त्यांचे हित साधा.

# मंत्री उदयजी सामंत यांचे गौरवोद्गार

**– नेहा जोशी**

२७ सप्टेंबर रोजी माननीय उद्योग आणि मराठी भाषा मंत्री श्री. उदयजी सामंत यांनी मुंबई ग्राहक पंचायत आयोजित ‘सेतू बांधा रे!’ व ग्राहक पंचायत पेठ, सिम्फनी बँक्वेट्स, अंधेरी येथे सदिच्छा भेट दिली. जान्हवी नाडकर्णी या कार्यकर्तीच्या सहयोगातून ही भेट घडून आली. ‘सेतू बांधा रे!’ ही विशेष पेठ २०२३ पासून आपली संस्था दरवर्षी आयोजित करते. संस्थेच्या कार्योपाध्यक्ष आणि पंचायत पेठ अध्यक्षा अनुराधा देशपांडे यांनी ‘सेतू बांधा रे!’ ही संकल्पना उलगडून सांगितली. आत्मनिर्भर होण्याचा आनंद या वंचित समाज बांधवांना मिळावा या हेतूने ‘सेतू बांधा रे!’ ही पेठ भरवली जाते. समाजातील वंचित, दिव्यांग जनांसाठी काम करणाऱ्या सामाजिक संस्था यात सहभाग घेतात. समाजातील ‘आहे रे’ वर्गाकडून ‘नाही रे’ या वर्गाला जोडणारा हा सेतू आहे. समाजातील मुख्य प्रवाहात नसलेल्या वर्गासाठी धडपडून त्यांना आत्मनिर्भर करण्यासाठी अनेक संस्था कार्यरत आहेत. अंध, मतिमंद, अपंग अशा वंचितांना प्रोत्साहन मिळावे यासाठी त्यांच्याकडून काही उत्पादने करून घेतली जातात, त्यांनी निर्मिती केलेल्या उत्पादनांना सेतूच्या माध्यमातून व्यासपीठ दिले जाते. मा. मंत्री उदयजी सामंत यांनी या सेतूला भेट द्यावी आणि अशा संस्थांना त्यांच्या कार्यासाठी शुभेच्छा द्याव्यात यासाठी मा. मंत्री उदयजी सामंत यांना संस्थेतर्फे निमंत्रित करण्यात आले होते. मा. उदयजी सामंत यांनी अनेक स्टॉलवर जाऊन सहभागी गाळेधारकांबरोबर संवाद साधला. त्यांची उत्पादने बघितली आणि आपुलकीने, आस्थेने त्यांची विचारपूस केली. अनेक सहभागींनी त्यांना आपली उत्पादने भेट देऊन आनंद व्यक्त केला.

कार्यक्रमास संबोधित करताना श्री. उदयजी सामंत म्हणाले की इथे येईपर्यंत माझ्या मनात जसे अनेक जण मंत्र्यांना बोलावतात तसेच तुम्ही पण बोलावले असेल असे होते. इथे आल्यावर लक्षात आले की हा शासनासाठी आणि माझ्यासाठी देखील महत्त्वाचा कार्यक्रम आहे. त्यांना हा उपक्रम खूप भावला म्हणूनच आणि सामाजिक गरज ओळखून ‘सेतू बांधा रे!’ या उपक्रमाला मुंबई ग्राहक पंचायत संस्थेला शासकीय जोड देऊन अधिक व्यापक प्रमाणात हा उपक्रम येत्या काळात करू असे आश्वासन नव्हे, तर वचन त्यांनी दिले. यामुळे केवळ या बांधवांना नाही तर त्यांच्या पालकांना खूप समाधान मिळेल असे ते म्हणाले. ते पुढे म्हणाले आपण ज्यांना वंचित म्हणतो ते खरे तर आपल्यापेक्षा देखील हुशार असतात. त्यांच्यातील स्पार्क आपल्याला ओळखता यायला पाहिजे. या निमित्ताने त्यांनी पूर्वी ते रत्नागिरीमध्ये करत असलेल्या दिव्यांग महोत्सवाच्या आठवणींना उजाळा दिला. माझ्याकडे असलेल्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (Micro, Small and Medium Enterprises) किंवा मुख्यमंत्री रोजगार निधी योजनामधून आपण काही सुनियोजित यंत्रणा तयार करण्याचा प्रयत्न करू तसेच सरकार या सगळ्यात तुमच्या बरोबर असेल अशी हमी त्यांनी दिली. आजपर्यंत दुर्बल घटकांना समाजातील अशा स्वरूपाचे व्यवसाय करण्यासाठी एखादी संस्था दालन उघडून देते अशी कुठलीही संस्था मी बघितलेली नाही ते काम तुम्ही केले आहेत असे गौरवोद्गार त्यांनी मुंबई ग्राहक पंचायतीचे कौतुक करताना काढले. पुढल्या वर्षी अधिक नियोजन करून विक्री अधिक होईल अशा ठिकाणी, दिवशी आपण ही पेठ भरवू अशी सूचना त्यांनी केली. हे केवळ विक्री प्रदर्शन नाही तर समाज प्रबोधन करणारे प्रदर्शन असे त्यांनी आवर्जून नमूद केले. विद्यमान मंत्र्यांनी एखाद्या स्वयंसेवी संस्थेसाठी वेळ काढणे आणि त्यांचे मनापासून कौतुक करणे हा संस्थेसाठी अभिमानाचा क्षण आहे.

कार्यक्रमाचा समारोप करताना संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड. शिरीष देशपांडे यांनी उदयजी सामंत यांचे आभार व्यक्त केले. ते असे म्हणाले की आज एक मंत्री महोदय नाही तर मूळ कार्यकर्ता उपस्थितांना संबोधित करत आहे असे वाटले. आपल्याबरोबर येत्या काळात या संदर्भात पाठपुरावा



करून नक्की आम्ही भरीव काम करू असे त्यांनी उदयजी सामंत यांना सांगितले. ते आले, त्यांनी बघितले अन् नवीन आशा उजळल्या अशा भावपूर्ण वातावरणात एका हृद्य भेटीची सांगता झाली.



# स्त्री शक्तीचा सन्मान... एक अनोखा पुरस्कार सोहळा!

**– नेहा जोशी**

२७ सप्टेंबर रोजी नवरात्रौत्सव चालू असताना एक अनोखा दिमाखदार स्त्री शक्तीचा सन्मान सोहळा सिम्फनी बँक्वेट्स, अंधेरी येथे संपन्न झाला. गेली ३ वर्षे मुंबई ग्राहक पंचायतीतर्फे भरवण्यात येणाऱ्या 'सेतू बांधा रे!' या विशेष पेठेत आपल्या महिला कार्यकर्त्यांचा 'नवदुर्गा पुरस्कार' देऊन गौरव करण्यात येतो. आपले कुटुंब, व्यवसाय, इतर जबाबदाऱ्या सांभाळून केवळ सामाजिक बांधिलकीपोटी या अष्टावधानी कार्यकर्त्या स्वयंसेवी वृत्तीने संस्थेसाठी योगदान देत असतात. त्यांचे कौतुक करून त्यांना शाबासकीची थाप द्यावी या विचाराने २०२३ मध्ये संस्थेचे कार्याध्यक्ष शिरीष देशपांडे यांच्या संकल्पनेतून 'नवदुर्गा पुरस्कार' ही संकल्पना साकारली गेली.

नवरात्रात हल्ली सगळीकडे ९ दिवस नवरंगांचा साज चढलेला आपण बघतो. मुंबई ग्राहक पंचायतीमध्ये मात्र वर्षभर अनेक दुर्गा आपल्या आपल्या स्वभावातील वैशिष्ट्यपूर्ण रंगबरहुकूम कामात दंग झालेल्या असतात. प्रत्येकीचे साधन वेगवेगळे असेल- कुणाचे लेखणी, कुणाची




वाणी, कुणी शांत पण आयोजन निपुण, तर कुणी खरेदीत चोखंदळ, कुणी हिशोबी, कुणी कायदे प्रवीण, कुणी टेक्नॉलॉजि निपुण .... असे अनेक मार्ग पण साध्य मात्र 'ग्राहक हिताय ... ग्राहक सुखाय!' खरेतर या साऱ्याचजणी पुरस्कारास पात्र पण वर्षभरात नाविन्यपूर्ण काम करणाऱ्या ९ महिला कार्यकर्त्यांना हा प्रातिनिधिक पुरस्कार दिला जातो. 'नवदुर्गा पुरस्कार' देण्यामागील दुसरा उद्देश असा की पुरस्कारामुळे अजून काम करण्याचे प्रोत्साहन मिळते शिवाय इतर कार्यकर्त्यांना पण ह्यातून उत्तम काम करण्यासाठी प्रेरणा मिळते.

नवदुर्गांची ओळख आणि प्रमुख पाहुण्यांची ओळख शुभदा चौकर यांनी करून दिली. त्यांनी प्रत्येक नवदुर्गेची खास शैलीत, त्यांच्या वैशिष्ट्यांसह ओळख करून दिली.

अवघे पाऊणशे वयोमान असणाऱ्या आपल्या यावर्षीच्या नवदुर्गा ठरल्या अलका मोकाशी! या वयातही तरुणाईला लाजवेल अशा उत्साहात वर्षभर विविध पेठांचे नियोजन त्या पेठ समिती सदस्य असल्याने करत आहेत. शिवाय वितरण समितीत देखील कार्यरत आहेत. पुढची नवदुर्गा - उल्का पाटील या देखील पेठ समितीमध्ये आहेत. त्यामुळे पेठांच्या कामात वर्षभर व्यग्र असतातच, पण अंधेरी विभागाचे खजिनदार पद तसेच ऑनलाईन संघाचे दरमहा होणारे वाटप या जबाबदाऱ्या पण लीलया पार पाडतात. पुढील नवदुर्गा अनघा रेगे. या देखील पेठ समिती सदस्या आहेत. गेली दोन वर्षे ठाणे पेठेची संपूर्ण जबाबदारी त्या आनंदाने निभावत आहेत. शिवाय ठाणे विभागाचे खजिनदार पदही सांभाळतात. वसई विभागाच्या कार्यवाह तसेच खरेदी समितीच्या सदस्या तृप्ती म्हात्रे या नवदुर्गेचे योगदान वसई विभागात आणि आपल्याला वाटपात मिळणाऱ्या उत्तम दर्जाच्या वस्तूंमध्ये दिसते. चेंबूर मधील अत्यंत धडपडी, उत्साही कार्यकर्ती जान्हवी नाडकर्णी पेठ समिती सदस्य आहे तसेच संस्थेचे नव्यानेच चालू झालेले युट्यूब चॅनेल अधिक सक्षम करण्यासाठी ही नवदुर्गा सतत धडपडत असते. टेक्नोसॅव्ही मृणाल बेडेकर ठरली पुढील नवदुर्गा! युट्यूब चॅनेल वरील व्हिडिओ अधिक देखणे करण्याचे काम मृणाल करते. तसेच आपले इंस्टाग्राम हॅन्डल देखील तीच सांभाळते. उच्च विद्याविभूषित असणारी ॲड. पूजा जोशी-देशपांडे ही रणरागिणी संस्थेच्या संरक्षण विभागात कार्यरत आहे. अनेक कायदेशीर लढ्यांमध्ये तसेच संस्थेच्यावतीने आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर आपली बाजू किंवा म्हणणे मांडण्यात तिचा सहभाग व पुढाकार असतो. पुढील नवदुर्गा अर्चना पानगांवकर ह्या मुंबई वितरणाच्या कार्यवाह, संस्थेच्या शिक्षण विभागात तसेच महारेरा कन्सिलिएटर म्हणून कार्यरत आहेत आणि नेहा जोशी ही नवदुर्गा 'ग्राहक तितुका मेळवावा' या मुखपत्रात, शिक्षण विभागात, युट्यूब चॅनेल तसेच कलेची आवड असल्याने त्या माध्यमातून ग्राहक सजगतेसाठी जे काही करता येईल ते योगदान देत आहे.

यंदा ज्येष्ठ लेखिका, निवेदिका, कर्णबधीर मुलांच्या शाळेच्या माजी मुख्याध्यापिका शोभा नाखरे यांच्या शुभहस्ते नवदुर्गांना सन्मानित करण्यात आले. संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड. शिरीष देशपांडे, विश्वस्त संजीव मंत्री, कार्योपाध्यक्ष आणि पेठ समिती अध्यक्ष अनुराधा देशपांडे,

कार्योपाध्यक्ष प्रभाकर गवाणे, प्रमुख पाहुण्या शोभाताई नाखरे व्यासपीठावर उपस्थित होते. नवदुर्गांच्या कौतुक सोहळ्यानंतर विदुषी शोभाताईंनी जणू एखादी मैफिल रंगवावी तसे  खुमासदार शैलीत अनेक किस्से, अनुभव, कविता, गजल, दोहे म्हणत आपले मनोगत व्यक्त केले. त्या म्हणाल्या की, आज पर्यटन दिन आहे आणि प्रत्येकवेळी एखादे ठिकाण बघणे म्हणजेच पर्यटन असते असे नाही. असे एखादे आगळंवेगळं प्रदर्शन बघणे, तेथील गाळेधारकांशी ओळख करून घेणे, त्यांच्या कार्याची, संस्कृतीशी तोंडओळख होणे हे देखील पर्यटनच आहे. हा उपक्रम उत्तम आहेच पण त्याचे नाव देखील कल्पक आहे असे सांगत संस्थेबद्दल गौरोवोउद्गार काढले. “एकदा ३ पावसाचे थेंब पृथ्वीवर घरंगळत येतात. पहिला थेंब म्हणतो, मी आहे तसाच राहणार, त्यामुळे तो वीट भट्टीवर पडून नाहीसा होतो. दुसरा म्हणतो मला सुंदर होऊन जायचे आहे. तो अळवाच्या पानावर पडतो, सूर्यप्रकाशात सुंदर चमकून तोही सुंदर होऊन नाहीसा होतो. पण तिसरा थेंब म्हणतो, मला पृथ्वीवर शाश्वत राहायचे आहे. त्यामुळे तो समुद्रात शिंपल्यात पडून त्याचा मोती होतो. अन् तो कायमस्वरूपी पृथ्वीवर विराजमान होतो. या तिसऱ्या थेंबाप्रमाणे आपल्या कामातून मोतीस्वरूप आपण या जगतात उरावे. अशी बोधपर गोष्ट सांगून शोभाताईंनी त्यांचे विचार मांडले.

संस्थेच्या कार्योपाध्यक्षा आणि पेठ समिती अध्यक्ष अनुराधा देशपांडे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, नवदुर्गा पुरस्कार हा प्रातिनिधिक स्वरूपात असतो. प्रत्येक कार्यकर्ता महत्त्वाचा आहे. ‘सेतू बांधा रे!’ हे स्वप्न अनेक वर्षे त्यांनी उराशी बाळगले होते, अखेर ते सत्यात उतरले त्याचा आनंद शब्दातीत आहे, असे त्यांनी नमूद केले.

संस्थेचे कार्याध्यक्ष शिरीष देशपांडे यांनी मनोगत व्यक्त करताना नवदुर्गांचे अभिनंदन केले. तसेच आता नवदुर्गांची जबाबदारी वाढली आहे, असेही त्यांनी वडीलकीच्या नात्याने सांगितले. 'सेतू बांधा रे!' चा वृक्ष अजून बहरत जावो, अशा सदिच्छा त्यांनी दिल्या. सुरेल मैफिल सजावी तसा कार्यक्रमाचा सूर लागला आहे त्यामुळे तृप्त झालो, असे म्हणत त्यांनी प्रमुख पाहुण्यांचे आभार मानले.

पर्यटन दिन तसेच जागतिक कर्णबधीर दिनाची पूर्वसंध्या, ‘सेतू बांधा रे!’ विशेष पेठ, नवरात्र हा त्रिवेणी संगम साधत कार्यक्रमाची गोड सांगता झाली. अनघा आचरेकर ह्यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभाराचे काम केले.

# बालग्राहक



## खेळण्यांची योग्य निवड

- अंजली पोतदार

***१४ नोव्हेंबर- बाल दिन. या निमित्त बालकांसाठी पालक पिढीची जी काही कर्तव्ये असतात त्यातले एक म्हणजे मुलांसाठी खेळण्यांची योग्य निवड.***

मे महिन्यातील गोष्ट. रविवारचा दिवस होता. दुपारची जेवणं झाल्यावर तीन वर्षाची रुही बिछान्यावर पुस्तकातील रंगीत चित्रं बघत लोळत होती. जरा शांत बसलीय म्हणून आई बाबा बाहेर हॉलमध्ये गप्पा मारत होते. अचानक रुही बाहेर धावत आली आणि म्हणाली, “बाबा, मी गोटी गिळलीय.” बाबांनी ऐकलं, गोळी गिळली. ते म्हणाले, “गेली ना पोटात? जाऊ दे. दुसरी देऊ का?” रुही म्हणाली, “अरे गोळी नाही, गोटी गिळली मी.”

ते ऐकल्यावर आई बाबा दोघेही घाबरले. धावत आत जाऊन बघतात तर काय! वाढदिवसाला मिळालेल्या ब्रेन गेम मधली गोटी चाळा म्हणून झोपून बघताना हातातून निसटून रुहीच्या तोंडात पडली. भांबावून काय करायचे ते न कळल्यामुळे रुहीने ती गिळून टाकली. झालं. लगेच तिच्या डॉक्टरांना फोन केला. डॉक्टरांनी एक्सरे काढायला सांगितलं. रविवार असल्यामुळे एक्सरे क्लिनिक बंद होते. शेवटी एका हॉस्पिटलमध्ये जाऊन एक्सरे काढला. त्यात दिसले की गोटी अन्ननलिकेतून आत लहान आतड्यात पोहोचलीय. डॉक्टरांनी ‘घाबरायचे काही कारण नाही’ असे सांगितले. आठ दिवसात गोटी शी वाटे बाहेर पडेल असेही सांगितले. त्यामुळे रोज आठ दिवस रुहीला डायपर घालून शी ची परीक्षा करण्याशिवाय आईबाबांच्या हाती काहीच नव्हतं. रुही नेहमीसारखी खात पीत, खेळत बागडत होती. तिला कुठेही दुखत नव्हतं किंवा काही त्रास होत नव्हता. शेवटी पुढच्या सोमवारी ती गोटी शी वाटे बाहेर पडली. ही खरी, माझ्या डोळ्यासमोर घडलेली गोष्ट आहे.

हा ब्रेन गेम रुहीला वाढदिवसाला मिळालेला. तो ५ वर्षांच्या पुढील मुलांसाठी होता. परंतु आईबाबांनी कितीही सावधानता बाळगली तरी असा एखादा अपघात चुकून घडू शकतो, नाही का? वाढदिवस म्हणा, दिवाळी, नाताळ सारखे सण म्हणा किंवा इतरही कारणानिमित्त मुलांना खेळणी दिली जातात. अगदी जन्मल्यापासून बाळाला खुळखुळा,खेळणी, फुगे, छोटी चावीची खेळणी, सॉफ्ट टॉय घेतली जातात. थोडं मोठं झाल्यावर भातुकली, बाहुल्या, बॅटबॉल, कॅरम, मेकॅनो अशी खेळणी तर नंतर इलेक्ट्रिक खेळणी, व्हीडिओ गेम्स, फुटबॉल अशी खेळणी घेतली अथवा दिली जातात. खेळण्यांमुळे मुलांच्या शारीरिक आणि मानसिक, बौध्दिक विकासात मदतच होते हे तर विज्ञानानेही सिध्द केलंय. मग ही खेळणी घेताना किंवा देताना आपण एक सजग, जबाबदार ग्राहक म्हणून काही सावधगिरी बाळगतो का? किंवा यासाठी आपल्या देशात खेळण्यांची काही नियम, मानके आहेत का? याबद्दल आज थोडी माहिती घेऊया.

भारतात जसे खाद्यपदार्थांच्या विक्रीसाठी fssai चिन्ह आणि प्रमाणपत्र अनिवार्य आहे तसाच १ सप्टेंबर २०२० पासून खेळणी गुणवत्ता आणि नियंत्रण कायद्यानुसार १४ वर्षांखालील मुलांसाठी सर्व खेळण्यांवर BIS मार्क म्हणजे 'ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड' (भारतीय मानक ब्युरो)चे प्रमाणपत्र अनिवार्य केले आहे.

आज बाजारात अनेक देशी, परदेशी नाविन्यपूर्ण खेळणी उपलब्ध आहेत. त्यातून सुरक्षित खेळणी निवडणे हे पालकांसाठी एक मोठे आव्हानच ठरते आहे. असुरक्षित खेळण्यांमुळे, खराब रचनेमुळे, आकारामुळे मुलांना दुखापत, विषबाधा किंवा गुदमरण्यासारखे प्रसंग उद्भवू शकतात. त्यातून मुलांबरोबर प्रत्येक वेळेला राहणे हेही व्यग्र दिनक्रमामुळे पालकांना शक्य नसते.

तर BIS प्रमाणपत्रामुळे निदान खेळण्यांच्या सुरक्षिततेची खात्री केली जाते. खेळण्यांना तीक्ष्ण कडा किंवा विषारी रंग नाहीयेत ना, इलेक्ट्रीक खेळण्यांना इन्सुलेशन आणि वायरिंग सुरक्षित आहे ना, यांत्रिक खेळण्यांचे सुटे भाग मुलांना इजा करणारे नाहीयेत ना या सर्वांची कसून खात्री केल्यावरच खेळणी उत्पादकांना किंवा आयातदारांना BIS प्रमाणपत्र दिले जाते. त्यामुळे खेळण्यांवरील BIS किंवा ISI चिन्ह हे सुरक्षितता आणि गुणवत्तेच्या विश्वा दिल्लीसार्हतेचे प्रतीक बनलंय.

हे प्रमाणपत्र घेणे देशांतर्गत उत्पादकांना आणि परदेशी आयातदारांना अनिवार्य आहे. नियमांचे पालन न केल्यास उत्पादन जप्ती, दंड आणि बाजारपेठेतील प्रवेश बंद केला जाऊ शकतो. गेल्याच वर्षी दिल्लीतील एका खेळण्याच्या स्टार्टअपने दिवाळी विक्रीसाठी चीनमधून १०,००० प्लॅस्टिकची खेळणी आयात केली. डिजाइन आकर्षक होते, किंमतही स्पर्धात्मक होती. मार्केटिंगही योग्य होते, पण ऑनलाईन लाँचच्या आधी काही दिवस त्यांची शिपमेंट कस्टम्समध्ये जप्त करण्यात आली, कारण म्हणजे खेळण्यांना BIS प्रमाणपत्र नव्हते.

खेळण्यांच्या वेष्टणावर खालील माहिती स्पष्ट असणे आवश्यक आहे-

१) कोणत्या वयोगटासाठी योग्य २) उत्पादकाचे नाव, पत्ता, ई-मेल, किंमत आणि कस्टमर केअर नंबर ३) वापराच्या सूचना ४) सुरक्षितता माहिती ५) किंमत

ही सर्व माहिती इंग्रजी आणि हिंदी या दोन्ही भाषांत असणे आवश्यक आहे.

अलिकडे खेळण्यांच्या शाश्वत आणि पर्यावरणपूरक पॅकेजिंगवरही भर दिला जातोय.

आपण सर्वांनी पब्जी सारख्या ऑनलाईन खेळामुळे मुलांनी केलेल्या आत्महत्यांबाबत ऐकलं असेलच. पण ते १४ वर्षांवरच्या मुलांचे खेळ आहेत. ऑनलाईन गेमिंग वर भारत सरकारने ३१ ऑक्टोबरपर्यंत लोकांची मते मागवलेली आहेत. त्यानंतर त्यासंबंधी कायदे केले जातील असे म्हटले आहे.



तूर्तास तरी पालकांनी आपल्या मुलांसाठी किंवा इतरांसाठी खेळणी घेताना किंवा देताना कोणती काळजी घ्यावी, याबद्दल जागरूक राहून खरेदी करावी.


# बाबा नापास

– सुरेश वांदिले

***१४ नोव्हेंबर बालदिनानिमित्त,आपल्या बालवाचकांसाठी गोष्ट!***

परवा तेजोमयी आणि अलेक्झांडरसोबत बाबा भाजीपाल्याच्या बाजारात गेले होते. रस्त्यावरून जात असताना, कडेला बसलेल्या कोळंबी विकणाऱ्याने एका मावशीने, बाबांना हाक मारली. तेजोमयी आणि अलेक्झांडर थांबले. पण बाबांनी मावशीला प्रतिसाद दिला नाही. तिच्याकडे बघितलंही नाही. तिने पुन्हा हाक मारली. बाबांनी पुन्हा दुर्लक्ष केलं नि ते पुढे जाऊ लागले. त्यांच्या मागे असलेल्या अलेक्झांडरने, मान वर करून, 'हे बाबांचं काय चाललंय? ते मावशीकडे लक्ष कां देत नाही?' अशा आशयाचे भाव चेहऱ्यावर आणून तेजोमयीकडे बघितलं. 'काय माहीत?' असं त्याच्याकडे बघत तेजोमयीने प्रतिक्रिया दिली. तिलाही बाबांचं हे वागणं खटकलं होतं.

बाबांचं नेहमी सांगणं असायचं की, एखाद्या विक्रेत्याने बाजारात आपल्याला हाक मारली, माल बघण्याची विनंती केली, तर त्यांच्याकडे दुर्लक्ष करायचं नसतं. आपल्याजवळचा माल घ्यावा, अशी जरी दुकानदाराची अपेक्षा असली तरी, तो माल घेतलाच पाहिजे, याची काही जबरदस्ती करू शकत नाही. पटलं तर घ्यायचं. नाहीतर पुढे जायचं. पण दुकानदारांच्या हाकेकडे दुर्लक्ष केलं तर त्यांना वाईट वाटू शकतं. हे छोटेछोटे विक्रेते श्रीमंत नसतात. त्यांचा चरितार्थ दिवसभराच्या विक्रीतून चालतो. त्यांच्या हाकेला दुर्लक्षून पुढे जाणं हा चांगला गुण नाही.



बाबांचं असं सांगणं त्याक्षणी तेजोमयीला आठवलं. तिला बाबांच्या वागण्याचं हसू आलं नि वाईटही वाटलं. 'ही मोठी मंडळी सांगतात एक नि करतात दुसरं!' असं ती मनात म्हणाली.

बाजारात वेगवेगळ्या भाजीपाला आणि फळांच्या दुकानात बाबा गेले. विक्रेत्यांशी बरीच घासाघीस करू लागले. ते बघून, बाबांनी एकदा तेजोमयीस सांगितलेलं आठवलं.

बाबा म्हणाले होते, "आपण मॉलमध्ये जातो, मोठ्या दुकानात जातो, तेव्हा मालाची जी किंमत असेल, त्यावर काही प्रश्न आपल्याला पडत नाही. तेव्हढी रक्कम सहज देता. मात्र, भाजीपाला किंवा फळवाल्यांसोबत आपण खूप घासाघीस करतो. हे छोटे विक्रेते फार नफा कमवत नाहीत. समजा त्यांना दोन पैसे जास्त गेल्यास, आपण गरीब होणार नसतो नि ते श्रीमंत होणार नसतात."

बाबा जे सांगतात, त्याच्या नेमंक उलटं वागतात हे पुन्हा एकदा तेजोमयीच्या लक्षात आलं.

सगळी खरेदी झाल्यावर तिघेही घरी आले. घरात पाऊल टाकताच, तेजोमयीने बाबांना टोकलं...

"बाबा, तुम्ही आज एकदा नव्हे तर दोनदा नापास झालात?"

"काय झालं? कोणती परीक्षा दिली होती त्यांनी. मला कसं माहीत नाही?" आईने विचारलं.

"मी नापास झालो म्हणजे काय झालं?" बाबांनी आश्चर्यचकित होत विचारलं.

"सांग रे अलेक्झू." तेजोमयी अलेक्झांडरकडे वळून म्हणाली.

"म्हणजे ठोंब्यालाही तुम्ही नापास झाल्याचं ठाऊकाय म्हणायचं. माझ्यापासून कां बरं लपवून ठेवलीत ही परीक्षा." आई त्रागाने म्हणाली.

"अगं कसली परीक्षाबिरीक्षा. तेजो काहीही बोलते." बाबा नाराजी व्यक्त करत म्हणाले.

"अलेक्झू तूच सांग बघू." तेजोमयी पुन्हा अलेक्झांडरला म्हणाली.

"तो काय सांगणार गधड्या?"

अलेक्झांडरला गधड्या म्हणताच आईचा पारा चढला. तिच्याशिवाय, अलेक्झांडरला कुणीही असं काही बोलू शकतं नव्हतं.

"अहो, त्याला कशाला गधड्या म्हणता. तेजो दोनदोनदा त्याची साक्ष काढते, याचा अर्थ, बाजारातच काहीतरी घडलं असलं पाहिजे." आई नाराजी व्यक्त करत म्हणाली.

"अगं, पण बाजारात कुठली आलीय परीक्षा?"

"तेजो, तूच सांगबाई काय झालं ते."

मग तेजोमयीने सगळा घटनाक्रम सांगितला.

"बाबा माझ्याकडून अपेक्षा करतात, असं करू नकोस, तसं करू नकोस असं सांगतात. स्वत: मात्र तसं वागत नाही. म्हणून परीक्षेत नापास झाल्याचं मी म्हणाले."

आपण खूपच चुकीचं वागल्याचं बाबांच्या तत्काळ लक्षात आलं. ते खजिल झाले. काहीही न बोलता ते पुन्हा तडक बाजाराकडे निघाले. मात्र रस्त्याच्या कडेला बसलेल्या मघाच्या मावशीबाई काही त्यांना दिसल्या नाहीत. सगळ्या कोळंब्या नि पापलेट विक्री झाल्यामुळे त्या निघून गेल्या होत्या.

बाबांना दु:ख झालं. या दु:खातच ते घरी आले. त्यांचा पडलेला चेहरा बघून आईने विचारलं,

"भेटली का मावशी?"

बाबांनी काय घडलं ते सांगितलं.

"अहो, मुलांवर चांगले संस्कार करायचे म्हणजे, बोलाचा भात नि बोलाची कढी नसते. आधी आपण तसं वागलं पाहिजे, तरच त्यांना त्याचं महत्त्व कळेल ना. नाहीतर परीक्षेत नापास होण्याची पाळी अशीच वरेचवर येत राहणार." आईने बाबांना समजावलं.

तेजोमयी आणि अलेक्झांडरच्या डोक्यावर हात ठेऊन यापुढे संस्काराच्या परीक्षेत कधीच नापास होणार नाही, अशी शपथच बाबांनी घेतली. तेजोमयीच्या चेहऱ्यावर हसू आलं. हे बघून अलेक्झांडरनेही उड्या मारत त्याचा आनंद व्यक्त केला.

## काय काय स्वस्त झालंय, माहितीये का?

**- मंगला गाडगीळ**

***१४ नोव्हेंबर बालदिनानिमित्त बालग्राहकांना खरेदीच्या स्मार्ट टिप्स,***
***विशेषतः GST कमी झाल्यानंतर बघा हे काय स्वस्त झालंय ते!***

दिवाळीच्या सुट्टीनंतरचा शाळेचा पहिला दिवस. शिवांश (शिवू) आणि महेश (माही) दोघे आठवीतील एकाच वर्गातील एकाच बाकावर बसणारे विद्यार्थी. बालवाडीपासून एकत्र असल्याने त्यांची घट्ट मैत्री होती. सहामाही परीक्षेच्या गणित विषयाच्या उत्तरपत्रिका सावे सर आज वाटणार होते. एका अर्थी निकालच. शिवूच्या मनात धाकधूक, तर माही शांत दिसत होता. त्याने हळूच एक चॉकलेट खिशातून बाहेर काढलं आणि माहीच्या हातात सरकवलं. 'कुछ मीठा हो जाए!'

शिवू म्हणाला, 'पेपर, मार्क यांचे टेन्शन, आणि तुला चॉकलेट काय सुचतंय?' माही म्हणाला, "ते टेन्शन घालवायलाच 'कुछ मीठा हो जाय', घे रे, स्वस्त मिळालंय."


'का? तुझ्या काकाचं दुकान आहे की मामाचं?'

'चल तसं नाही. GST की कसला तरी टॅक्स कमी झालाय ना! म्हणून स्वस्त.'

सरांनी या दोघांची चाललेली खुसखुस तिरक्या नजरेनं टिपली. सरांनी दोघांना उभं केलं. 'काय बोलत होतात?' शिवूने पुटपुटत हळूच सांगितलं की, माही म्हणतोय - चॉकलेटची किंमत आता कमी झाली आहे. कारण कुठला तरी टॅक्स कमी झालाय. मुलांना आजूबाजूला घडणाऱ्या घटनांची कल्पना असल्याचे पाहून सरांना बरं वाटलं.

सावे सर मुलांना नेहमीच सांगायचे की, रोजचं वर्तमानपत्र वाचत चला, बातम्या ऐकत रहा. आपल्या आजूबाजूला, राज्यात, देशात किंवा जगात सुध्दा काय चालू आहे हे आपल्याला माहित असायला हवे. सावे सर गणित शिकवणारे. त्यांनी वाटायचे पेपर बाजूला ठेऊन मुलांना एक गणित करायला सांगितलं.

समजा, एक चॉकलेट १५० रुपयांचे आहे. पूर्वी त्यावर १२% टॅक्स होता. आता तो ५% आहे तर पूर्वीच्या आणि आताच्या किमतीत किती फरक पडेल? सगळी मुलं चक्रावली. पेपर द्यायचे सोडून सर गणित करायला काय सांगतायत? तरी मुकाटपणे प्रत्येकाने रफ वही काढली आणि आकडेमोड करायला सुरुवात केली. माही गणितात हुशार, स्कॉलरशिपच्या परीक्षेला बसणार होता. त्याने एका मिनिटात उत्तर दिलं की सर, १०.५०



रुपयांचा फरक किंवा स्वस्त पडेल. सरांना स्वतःला समाधान वाटले की स्कॉलरशिपच्या परीक्षेची तयारी योग्य पध्दतीने चालू आहे.

'मुलांनो, गुड्स अँड सर्व्हिसेस टॅक्स (जीएसटी) हा आपल्याकडील वस्तू आणि सेवा यांच्यावर लागणारा टॅक्स आहे. वस्तू आणि सेवा कर दरांमध्ये मोठे बदल २२ सप्टेंबर २०२५ पासून लागू झाले आहेत. विविध पॅक केलेल्या वस्तूंचे जीएसटी दर कमी झाले आहेत. त्यामुळे बहुतेक वस्तूंवरील कर प्रामुख्याने ५% आणि १८% असे सुटसुटीत असणार आहेत. दूध आणि दुधापासून बनवलेले पदार्थ, फरसाण, स्वयंपाकाची भांडी अशा दैनंदिन जीवनावश्यक वस्तू यावर ५% कर असणार आहे. तुम्हाला विमा माहित असेलच. वैयक्तिक आरोग्य आणि जीवन विम्यावरील जीएसटी सूट देण्यात आली आहे, म्हणजेच शून्य टक्के कर असेल. जीवनरक्षक औषधे (कॅन्सर सारख्या व्याधींसाठी) अतिशय महत्त्वाची असतात. त्यावरील कर सुध्दा शून्य टक्के करण्यात आला आहे.

आता तुमच्यासाठी महत्त्वाचं! शाळेची
पुस्तके, वह्या, पेन, पेन्सिल अशा शैक्षणिक वस्तूंवर वस्तूंवरील जीएसटी दर शून्य करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे दैनंदिन जीवनावश्यक वस्तू, कृषी वस्तू, आरोग्य सेवा उपकरणांवरील जीएसटी ५% पर्यंत कमी करण्यात आला आहे.

पान मसाला, कार्बोनेटेड पेये अशा हानिकारक वस्तूंवरील जीएसटी ४०% पर्यंत वाढवण्यात आला आहे. या उत्पादनांना हानिकारक किंवा 'Sin Products' म्हटले आहे. त्याचे कारण स्पष्ट आहे की त्यामुळे शरीराचे आणि पर्यावरणाचे सुध्दा नुकसान होते. सॉफ्ट ड्रिंकमध्ये जितके पाणी असते त्यापेक्षा कैक पटीने जास्त पाणी या उद्योगात वापरले जाते. जीएसटी कमी झाल्यामुळे काय बरं फरक पडेल? यामुळे वस्तूंची विक्री, वापर वाढेल. एकूणच अर्थव्यवस्था सुधारायला मदत होईल.

टीनाने विचारले- 'सर, टीव्ही स्वस्त होणार असेल तर मी पप्पांना मोठ्ठा टीव्ही घ्यायला सांगेन.' वामिका म्हणाली, 'मी तर डिश वॉशर घ्यायला सांगेन. 'मेड' आली नाही की मम्मीची कटकट सुरू होते. ही कटकट कायमची मिटेल.' दीपेश म्हणाला, 'हे तर काहीच नाही मी तर मोटारसायकलसाठी पप्पांच्या मागे लागतो. १८ वर्षानंतर मी जेव्हा कॉलेजला जाईन तेव्हा ऐटीत मोटारसायकलवरून जाईन.'

मुलांना स्वप्नातून बाहेर काढत सर म्हणाले की, मुलांनो, या सगळ्या फार मोठ्या आणि लांबच्या गोष्टी झाल्या. आता आपण काय केले पाहिजे यावर बोलू. तुम्ही खाऊची पाकिटे खरेदी करता ना त्यावेळी त्याच्या वेष्टणावर काय पाहिले पाहिजे? आता आपण किमतीबाबत विचार करतोय, तेव्हा त्याची किंमत कमी झाली आहे की नाही हे प्रामुख्याने पाहीले पाहिजे. खाऊ म्हणजे पॅक केलेले चिप्स, वेफर्स, फरसाण वगैरे. विकत घेताना त्याबद्दल दुकानदाराकडे सुध्दा विचारणा करायला हरकत नाही. या वस्तूंबरोबर आईस्क्रीम, लस्सी सारख्या वस्तूंची किंमत नीट तपासली पाहिजे. एमआरपी बघतानाच युनिट सेल प्राईस बघितली पाहिजे. या वस्तू तुमच्यामध्ये 'हिट' असतात. तुम्ही त्या सहज म्हणूनही विकत घेता आणि खाता. आपली नेहमी घ्यायची काळजीही विसरता कामा नये. मुख्य म्हणजे इन्ग्रेडियंट. चिप्स, वेफर्स सारख्या वस्तूंमध्ये बहुतेक वेळा पिष्टमय पदार्थ, मीठ, साखर आणि तेलाचे प्रमाण जास्त असते. जीवनसत्व किंवा मिनरल्स अत्यंत कमी प्रमाणात असतात त्यामुळे हे पदार्थ फार खाता कामा नये. शिवाय 'बेस्ट बिफोर' तारीख तपासायला विसरायचं ...?

'नाही'- सर्व मुले कोरसमध्ये एका सुरात म्हणाली. आणखी काय बघायला हवं?

शर्वरी – 'सर, मी सांगू? fssai लोगो.' बरोबर. पण ते कशासाठी बघायचं? त्यावरून आपल्याला कळतं की पॅकेटमधला खाऊ सुरक्षित आणि दर्जेदार आहे.'

'बरोबर. FDA किंवा अन्न आणि औषध प्रशासन हा लोगो देते. आणखी काय महत्त्वाचं?'

प्रणवने सांगितलं की, व्हेज/नॉनव्हेज लोगो. पण सर, एक शंका आहे. व्हेज लोगो हिरवा गोल असतो. पण नॉनव्हेज लोगो लाल त्रिकोणी असतो, असं का?

'काही लोकांच्या डोळ्यात रंगांधळेपणा असतो. त्यांना विशेषतः डार्क रंगातला फरक लक्षात येत नाही, पण आकारावरून त्यांना नॉनव्हेज पदार्थ ओळखता येतो. शिवाय वजन किती आहे तेही पहिले पाहिजे.'

तास संपायला आला होता. 'आता पेपरचे काम करू या. आपापले पेपर नीट बघा. काही शंका असल्यास विचारा.' असे म्हणून सरांनी पेपर वाटायला सुरुवात केली.

## पोलिस स्थानकात रक्षाबंधन

**– वृषाली ठवाळ,**
**कार्यवाह सांताक्रुझ विभाग**

मुंबई ग्राहक पंचायतीच्या सांताक्रुझ विभागातर्फे ९ ऑगस्ट रोजी सांताक्रुझ पोलिस स्टेशन (प.) येथे रक्षाबंधनाचा सण अनोख्या रीतीने साजरा केला गेला. विवेक ठवाळ यांनी पोलीस बांधवांना आपल्या संस्थेची माहिती सांगितली. त्यानंतर वृषाली ठवाळ, विद्या पेडणेकर, शुभदा बाईंग, आरती आजगावकर, स्मिता डोईफोडे आणि नीला कदमबांडे यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक गौरीश शिंदे व योगेश शिंदे यांसह तेथील सर्व पोलीस बांधवाना राख्या बांधल्या. तसेच विक्रमगड येथील आदिवासी महिलांनी बनवलेल्या कापडी पिशव्या व खाऊचा पुडा देण्यात आला. त्याचप्रमाणे जवळच असलेल्या वाहतूक विभागातील पोलीस बांधवांनाही राख्या बांधण्यात आल्या.



## मालाड विभागात मुलांसाठी उपक्रम

**– चित्रा जोशी, कार्यवाह, मालाड विभाग**

१४ सप्टेंबरला मुंबई ग्राहक पंचायत, मालाड विभागातर्फे अस्मिता ज्योती सोसायटीमध्ये अपर्णा परांजपे यांनी घरातील पर्यावरणपूरक वस्तू वापरून आरतीची थाळी कशी सजवावी हे वेगवेगळ्या प्रकारे मुलांना आणि महिलांना शिकवले. त्यानंतरच्या सत्रात सोसायटीतील रहिवासी डॉ. रुची जाधव यांनी ‘दातांची काळजी कशी घ्यावी’ हे स्लाईडद्वारा उत्तम पध्दतीने समजून सांगितले. दात घासण्यासाठी मऊ ब्रश वापरावा, दर दोन तीन महिन्यांनी ब्रश बदलावा, सहा महिन्यांनी दातांच्या डॉक्टरकडे जावे, दर बारा तासांनी दात घासावे, आठवड्यातून एकदा तरी माऊथ वॉश वापरावा, इत्यादी उपयुक्त माहिती दिली. मुलांनीही प्रश्न विचारले. ह्या कार्यक्रमाला डॉ. विनय पांडुरंगी हे सिनियर, अनुभवी डेंटिस्ट अध्यक्ष म्हणून लाभले होते. अल्पोपहार देऊन कार्यक्रमाची सांगता झाली. अरविंद स्वार, संगीता स्वार, चित्रा जोशी, रिटा लुईस, प्रगती साटम आणि छाया मोहिते यांच्यामुळे कार्यक्रम छान झाला.

२७ जुलैला अस्मिता ज्योती सोसायटी येथे राखी बनवण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. श्रिया पाठक हिच्या गणेश वंदनेच्या नृत्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली. मुग्धा वैद्य यांनी अतिशय सोप्या प्रकारे मुलांना राख्या तयार करायला शिकवल्या. त्यात १८ मुलांनी भाग घेतला होता. राखी बनवण्याचे साहित्य मुग्धा वैद्य यांनी स्वखर्चानी तयार करून आणले होते. मुलांना अल्पोपहार देऊन कार्यक्रमाची सांगता झाली. अरविंद स्वार, चित्रा जोशी, अर्चना बेलाडी, प्रगती साटम ह्या सभासदांच्या परिश्रमाने कार्यक्रम छान झाला.

## नवीन संघास मान्यता

| | | |
|---|---|---|
| **मुंबई** | | |
| सनरूप ग्राहक संघ | 22190ML | सभासद 14 |
| मरीना एनक्लैव ग्राहक संघ | 41544MD | सभासद 14 |
| मरीना ए ग्राहक संघ | 32139DR | सभासद 10 |
| सुमित भवन ग्राहक संघ | 32525GR | सभासद 07 |
| साईकृपा ग्राहक संघ | 11767BO | सभासद 07 |
| अनुथम सी ग्राहक संघ | 22187ML | सभासद 09 |
| अनुथम डी ग्राहक संघ | 22188ML | सभासद 15 |
| अनुथम इ ग्राहक संघ | 22189ML | सभासद 12 |
| श्रीसाईदीप ग्राहक संघ | 41191ML | सभासद 09 |
| चित्रकूट ग्राहक संघ | 31171DH | सभासद 10 |
| **ठाणे** | | |
| पॅरामाउंट ग्राहक संघ | 15691TN | सभासद 12 |
| **पुणे** | | |
| मार्वल ब्रिसा ग्राहक संघ | 19249PU | सभासद 14 |

## १२०० कापडी पिशव्यांचे वाटप

पर्यावरण प्रिय गणेशोत्सव अभियानाचा भाग म्हणून ठाणे वितरण विभागाच्या वतीने 'प्लास्टिकला पर्याय कापडी पिशवी' या मोहिमेअंतर्गत माय ग्रीन सोसायटी या संस्थेच्या सहकार्याने नौपाडा येथील हिंदू जागृती सार्वजनिक गणेशोत्सव मंडळास भेट देणाऱ्या भाविकांना १००० कापडी पिशव्यांचे मोफत वाटप करण्यात आले. ओसवाल पार्क सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातही २०० कापडी पिशव्यांचे मोफत वाटप करण्यात आले. खरेदीसाठी कापडी पिशवीचाच वापर करावा व एकूणच प्लॅस्टिकचा वापर कमी करून किंबहुना एकल वापर प्लास्टिक टाळून झिरो कार्बन उत्सर्जनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी हातभार लावावा, यासाठी सर्वांना आवाहन करण्यात आले.

# ग्राहक पंचायत पेठ ठाणे: एक उत्साही सोहळा

मुंबई ग्राहक पंचायत आयोजित पंचायत पेठेचे आयोजन दि. १७ ते २४ सप्टेंबर २०२५ ह्या कालावधीत ठाणे येथील कांती विसारिया हॉल मध्ये करण्यात आले होते. वैविध्यपूर्ण उत्पादनांच्या स्टॉल्सनी सजलेल्या ह्या आठ दिवसाच्या पंचायत पेठेने आपले पूर्वीचे उलाढालीचे सर्व विक्रम मोडत ह्या वर्षीची २,८१,५७,६१६/- रु. एवढ्या प्रचंड उलाढालीची नोंद केली.

पंचायत पेठेचा उद्घाटन सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला. ठाणे येथील अनेक उत्साही कार्यकर्ते, पंचायत पेठ समिती, ठाणे वितरण केंद्र पदाधिकारी आणि गाळेधारकांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. उद्घाटनासाठी 'आधार रेखा प्रतिष्ठान' ही नोंदणीकृत संस्था कॅन्सरग्रस्त रुग्णांसाठी पुनर्वसन आणि मार्गदर्शक म्हणून कार्य करते.

सुरुवातीला गणेशमूर्तीला पुष्पहार अर्पण करून पंचायत पेठेचा हा उपक्रम निर्विघ्नपणे पार पडावा अशी प्रार्थना करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. ह्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ठाणे विभागीय अध्यक्ष मिनलताई टिपणीस होत्या. पंचायत पेठ अध्यक्षा अनुराधा देशपांडे ह्यांनी ह्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

पंचायत पेठेचे हे ४७ वे वर्ष. बाजारपेठेतील अनेक आव्हाने समोर असतांनाही ग्राहक पंचायत पेठांवरील ग्राहकांचा विश्वास यासाठी धडपडणारे संस्थेचे स्थानिक कार्यकर्ते, पंचायत पेठ समितीची मेहनत ह्याचा उल्लेख केला. आगामी 'सेतू बांधा रे!' ह्या विशेष पेठेमागची भूमिका विशद करून ह्या पेठेला भेट देण्याचे आव्हान केले. उद्घाटक रश्मी जोशी ह्यांनी आपले विचार व्यक्त करतांना त्यांचे आपल्या संस्थेशी सदस्य असल्याबद्दलचे समाधान आणि अशा संस्थेच्या उपक्रमाला उद्घाटक म्हणून निमंत्रित केल्याबद्दल धन्यवाद दिले. त्यांची स्वतःची कॅन्सरग्रस्त रुग्णासाठी काम करतात. ह्या संस्थेचे महत्त्व आणि कार्य त्याची आज असणारी गरज विशद करून मुंबई ग्राहक पंचायत आणि 'आधार रेखा' ही संस्था एकत्रित कार्य करू शकेल अशी इच्छा व्यक्त केली. ठाणे वितरण केंद्राचे कार्योपाध्यक्ष प्रभाकर गवाणे ह्यांनी ह्या पेठेला शुभेच्छा दिल्या.

विभागीय अध्यक्षा मिनलताई टिपणीस ह्यांनी पंचायत पेठेच्या व्यासपिठावरून ठाणे विभाग पर्यावर विषयक विविध उपक्रम आयोजित करतो ह्याबद्दल माहिती दिली. मुदतबाह्य झालेल्या औषधांचे संकलन करून 'ग्रीन फार्मसी' ह्या संस्थेकडे त्याची शास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी दिले जाते ह्याबद्दलही माहिती दिली. ठाणे विभागीय कार्याध्यक्ष हीरा अकोलकर ह्यांच्या मार्गदर्शनाखाली ठाण्याचे अनेक नवे-जुने कार्यकर्ते ह्या पेठेसाठी आठ दिवस कार्यरत होते. पेठेतील वितरण स्टॉलची जबाबदारी घेणारे प्रभाकर गवाणे, कौस्तुभ सुळे, सुनिल कुंटे ह्यांनी अत्यंत उत्साहाने ह्या स्टॉलची जबाबदारी सांभाळली. पंचायत पेठ समिती सदस्य अनघा रेगे ह्या संपूर्ण पेठेच्या स्टॉलचे नियोजन करत होत्या. पेठेच्या अनुभवी कार्यकर्त्या सुचिता पाटणकर ह्यांच्या सहकार्याने हे नियोजन केले गेले.




## विद्यानिधी शाळेत पर्यावरणाचा वसा

– नीलम प्रभू, मुख्याध्यापिका



विद्यानिधी शिक्षण संकुलामध्ये गेल्या ५३ वर्षांपासून म्हणजेच १९७२ पासून गणेशोत्सव साजरा केला जातो. या गणेशोत्सवाच्या निमित्ताने ४०-५० वर्षांपूर्वीचे विद्यार्थीही आवर्जून शाळेत गणरायांच्या आरती करीता एकत्र जमतात. गणेशोत्सव काळात विद्यार्थ्यांना अनेक उपक्रम व स्पर्धांमधून संस्कारीत करण्याचा शाळेचा प्रयत्न असतो. रांगोळी, विज्ञान रांगोळी, मेहंदी, स्तोत्र/आरती पाठांतर, गणेशमूर्ती बनवणे, थाळी डेकोरेशन, फेस पेंटिंग, निबंध लेखन, वक्तृत्त्व, गायन, पदार्थ विक्री, आनंदी खेळ अशा विविध स्पर्धांचा समावेश असतो. या व्यतिरिक्त विद्यार्थ्यांनी घरून तयार करून आणलेल्या पदार्थांची विक्री करण्याचा 'आनंद मेळा' ही रंगतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञानाची ओळख होते. शाळेत वर्षभर मुंबई ग्राहक

## उत्तम कार्यकर्त्या सुनीताताईंना श्रध्दांजली



सुनीता अभ्यंकर सोमवार दि. २९ सप्टेंबर २०२५ निवर्तल्या, हे समजले. संस्थेच्या अंधेरी विभागातील एक ज्येष्ठ कार्यकर्त्या' या पलीकडे त्यांची ओळख आमच्या कार्यकर्त्यांना करून द्यायला हवी.
१९८५ मध्ये माझा संस्थेत प्रवेश झाल्यानंतर नीलाताई गोवीलकर, सुनीताताई अभ्यंकर आणि ललिताताई कुलकर्णी अशा या 'तीन देवीयां' बद्दल सुरवातीपासूनच मला एक आदरयुक्त कुतूहल वाटत आले. या तिघींचीही अंगकाठी अगदी सडसडीत, बारीक. खऱ्या अर्थाने या 'हाडाच्या कार्यकर्त्या'. रंगाने तिघींचेही 'सावळे ते रुप'. त्यामुळे सुरवाती सुरवातीला तर नीला ताई कोण, ललिता ताई कोण आणि सुनीता ताई कोण याबाबत माझा खूप गोंधळ व्हायचा. पण हळूहळू त्या प्रत्येकीची आपापली खासियत मला कळत गेली आणि या तिघीही सर्वार्थाने हाडाच्या कार्यकर्त्या कशा आहेत, याची वेळोवेळी प्रचिती येत गेली.

सुनीताताई या मूळच्या अंधेरी विभागातील कार्यकर्त्या. जुहू गल्ली येथे राहणाऱ्या. तत्कालीन विभागीय कार्याध्यक्ष पाटणकर गुरुजी यांच्या मार्गदर्शनाने तयार झालेल्या सुनीताताईंनी पुढे विभागीय कार्यवाह, जनता मध्यवर्ती कार्यवाह, विभागीय कार्याध्यक्ष, 'ग्राहक'च्या संपादिका अशा अनेक जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळल्या. मला त्यांचे संपादकीय खूप आवडायचे. शब्दांचे अवडंबर न माजवता अगदी सहज, सोप्या शब्दात त्या लिहीत जात. त्यांचा स्वभाव शिस्तप्रिय, म्हणून मी त्यांना तसा घाबरूनच असे. आपल्या मतांबद्दल त्या नेहेमीच ठाम आणि आग्रही असायच्या. कार्यकारिणीच्या इतिवृत्ताच्या अचूकतेबद्दल त्या नेहेमी सतर्क असायच्या. 'ग्राहक भवन' उभारणीसाठी सदस्यांकडून देणग्या मिळवण्यासाठी त्या आघाडीवर होत्या. ग्राहक संरक्षणाच्या अनेक मोहिमांमध्ये सुध्दा त्यांचा सक्रीय सहभाग असे. शिक्षण विभाग प्रमुख म्हणूनही सुनीताताईंनी अनेक वर्षे जबाबदारी सांभाळली. अंधेरी विभागात फार मोठ्या प्रमाणावर संघ उघडण्यात त्या आणि नीलाताई म्हात्रे नेहेमीच आघाडीवर असायच्या. कार्यकारीणी सभेत आपले वेगळे मत असले तरी ते स्पष्टपणे आणि नम्रपणे मांडण्यास कचरत नसत. उत्तम कार्यकर्त्याच्या अंगी आवश्यक असे अनेक गुण सुनीताताईंच्या साध्याशा व्यक्तिमत्त्वात सहज भिनलेले आढळून येतात. गेली काही वर्षे सुनीताताई कौटुंबिक अडचणी आणि स्वतःच्या आजारपणामुळे संस्थेच्या कार्यात क्रियाशील नव्हत्या. संस्थेतील काही मार्गदर्शक दीपस्तंभामधे सुनीताताईंचे नाव निश्चितच घ्यावे लागेल.

गंगाधरराव गाडगीळांपासून संस्थेत कोणाचीही फिरकी घेणारे असेच आपले दुसरे एक ज्येष्ठ कार्यकर्ते अरविंद दिघे सुनीता ताईंचा उल्लेख नेहेमी 'जूहू गल्ली' म्हणून हसत हसत करत असत. आज ती 'जुहू गल्ली' सुनीताताईंवाचून सुनी सुनी भासेल. सुनीताताईंना भावपूर्ण श्रध्दांजली.

**– ॲड. शिरीष वा. देशपांडे, कार्याध्यक्ष**

पंचायतीतर्फे घेण्यात येणाऱ्या अनेक उपक्रमांमुळे उद्याचा नितीमान उद्योजक व सजग ग्राहक तयार होण्यास मदत होते.

**गणेशोत्सवात पर्यावरण संवर्धन:** या संपूर्ण उत्सवादरम्यान विद्यार्थ्यांच्या मनावर पर्यावरण संवर्धनाची शिकवण बिंबवण्यासाठी काटेकोर प्रयत्न केले जातात. शाळेच्या आवारातच एक छोटा पाण्याचा कुंड तयार करून त्यात विसर्जन केले जाते. नंतर तेच पाणी झाडांना दिले जाते. तसेच शाळेत गणेशोत्सवादरम्यान जमा होणाऱ्या निर्माल्यापासून विद्यार्थी शिक्षकांच्या मदतीने सेंद्रीय खत तयार करतात.

**प्लास्टिक कलेक्शन:** 'प्लास्टिक कलेक्शन' नावाचा एक उपक्रमही शाळेत राबवला जातो. यात गणेशोत्सवात घरी येणारे प्रसाद, फुले आणि इतर वस्तू ज्या प्लास्टिकच्या पिशव्या आणि डब्यांतून घेऊन येतात, ते प्लास्टिक जमा करून शाळेत आणले जाते. जो वर्ग सर्वात जास्त प्लास्टिक जमा करेल, त्या वर्गाला 'पर्यावरण रक्षक वर्ग' म्हणून घोषित करून बक्षीस दिले जाते. जमा झालेले प्लास्टिक शाळा एका संस्थेला देऊन ते पुनर्वापरासाठी पाठवते.

गणरायाची मूर्ती निवडण्यापासून आगमन, पूजा, प्रसाद बनवणे आणि मखर सजवणे, या सर्व कामांमध्ये उपनगर शिक्षण मंडळाच्या सर्व शाखांचे विद्यार्थी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सहभागी होतात.

# सोहळा खरेदीचा

**– मेघना कुलकर्णी, कार्याध्यक्ष,**
**वसई-नालासोपारा विभाग**




मुंबई ग्राहक पंचायत आयोजित ग्राहक पंचायत पेठेचे आयोजन 'गणपतराव वर्तक क्रिडा भवन' येथे ३० सप्टेंबर ते ६ ऑक्टोबर २०२५ ह्या कालावधीत करण्यात आले. वसई येथील पंचायत पेठेचे हे १२ वे वर्ष होते. ह्या वर्षी गणपतराव वर्तक सभागृहाचे नूतनीकरण होऊन संपूर्ण हॉल अतिशय देखणा, वातानुकूलित होता. तसेच अजून एक छोटे सभागृह उपलब्ध झाले होते. अत्यंत प्रसन्न वातावरण, वाढलेले स्टॉल, वैविध्य, ग्राहकांना निवडीचे भरपूर स्वातंत्र्य ह्यामुळे यंदा वसई पेठेने विक्रमी उलाढाल केली. सात दिवसाच्या ह्या पंचायत पेठेची उलाढाल २ कोटी ४२ लाख (२,४२,५४,५६४/- रु.) एवढी झाली. एकंदर ७१ स्टॉल होते.

ह्या पंचायत पेठेच्या उद्‌घाटनाचा दिमाखदार सोहळा आमदार स्नेहाताई दुबे ह्यांचे हस्ते संपन्न झाला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेच्या कार्यवाह अनिता खानोलकर ह्यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात संस्थेला आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर होण्यासाठी पंचायत पेठेतून मिळणाऱ्या उत्पन्नाचा मोठा भाग असतो, बाजारपेठेतील उचित व्यवहाराचा अवलंब करून आयोजित होणाऱ्या ह्या पंचायत पेठेत ग्राहकांनी विश्वासाने जरूर खरेदी करावी असे आवाहन त्यांनी या प्रसंगी केले.

मुंबई ग्राहक पंचायत पेठेच्या पंचायत पेठ अध्यक्षा अनुराधा देशपांडे यांनी पंचायत पेठेची संकल्पना वसई मध्ये कशी आकाराला आली, आणि त्यासाठी आधारस्तंभ असलेले कै. आनंद अभ्यंकर यांचा कृतज्ञतेने उल्लेख केला. एवढ्या वर्षात दरवर्षी या पंचायत पेठेची लोकप्रियता वाढत आहे, याचा अभिमान आणि आनंद वाटतो. कितीही आव्हाने आली तरी वसईचे स्थानिक कार्यकर्ते या आव्हानांना सामोरे जात पंचायत पेठेचे हे कार्य अतिशय आनंदाने आणि उत्साहाने पार पाडतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मा. आमदार स्नेहाताई दुबे यांनी कार्यक्रमाचे उद्‌घाटन केले. आपल्या मनोगतात आत्मनिर्भर भारत आणि स्वदेशी या महत्त्वपूर्ण विषयांवर व्यक्त होत असतांना संस्थेचे हे स्वदेशी तत्व अंगिकारून छोटे-छोटे उत्पादक उत्तम उत्पादनांचा व्यवसाय करतात याबद्दल समाधान व्यक्त केले. पंचायत पेठेच्या उपक्रमामध्ये 'जागो ग्राहक जागो' हा स्टॉल ग्राहकांना जागृत करतो आणि उद्योजकांना उचित व्यवहाराचा पाठ देतो असे प्रतिपादन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा वीणाताई गवाणकर यांनी वसईतील नागरीकांसाठी पंचायत पेठेचे महत्त्व का असते याबद्दल विचार व्यक्त करत असतांना उत्तम दर्जा, रास्त किंमत आणि वैविध्यपूर्ण उत्पादने एकाच छत्राखाली दिवाळीच्या आधी मिळतात. इतरत्र खरेदीसाठी जावे न लागल्याने होणारी सोय आणि अनेक ज्येष्ठांना पंचायत पेठेच्या कालावधीत एकत्र भेटीचा योग मिळून येतो असे सांगून त्यांनी पंचायत पेठेला शुभेच्छा दिल्या. संघवाढ/संघ संवर्धन उद्देशाने वसई येथील पंचायत पेठेत वितरणातील काही वस्तू ग्राहकांसाठी उपलब्ध होत्या. या स्टॉलच्या आयोजनाची पूर्ण जबाबदारी वसई वितरणाचे कार्याध्यक्ष विनायक सोमण आणि कार्यवाह प्रकाश पाटील यांनी अनेक कार्यकर्त्यांच्या सहाय्याने उत्तम सांभाळली.

कार्यक्रमाच्या समारोपाचे आभारप्रदर्शन वसई-नालासोपारा विभागाच्या कार्याध्यक्ष मेघनाताई कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन महेश अभ्यंकर यांनी केले.

या कार्यक्रमाच्या वेळी वसई-नालासोपारा विभागाने पर्यावरण संवर्धन या विषयावर चित्रकला स्पर्धा आयोजित केली होती. त्यातील विजेत्यांना आमदार स्नेहाताई दुबे आणि विभागीय

अध्यक्षा वीणाताई गवाणकर यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले. पारितोषिकपात्र विद्यार्थ्यांनी काढलेली चित्रे पेठेमध्ये प्रदर्शित करण्यात आली होती.


पंचायत पेठेतील 'जागो ग्राहक जागो'च्या स्टॉलवर एका वेगळ्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वसई येथील 'न्यू इंग्लिश स्कूल ॲण्ड ज्युनियर कॉलेज'मधील विद्यार्थ्यांना ग्राहक जागृतीची माहिती देण्यासाठी निमंत्रण दिले होते. त्यानुसार NSS च्या ३५ विद्यार्थ्यांनी या स्टॉलला भेट दिली. मंगला गाडगीळ यांनी विद्यार्थ्यांना ग्राहक हितार्थ असणारी सरकारी ग्राहकोपयोगी बोधचिन्हे दाखवून त्यांचे महत्त्व सांगितले. BIS Care ॲपमध्ये ISI किंवा HALL MARK कसा तपासावा याचे प्रात्यक्षिक दिले. असली-नकली मधील फरक ओळखणे याबद्दल प्रबोधन केले. अशा पध्दतीने वसई येथील १२वी पेठ यशस्वीपणे संपन्न झाली.

## व्यावसायिक आणि सामाजिक बांधिलकीचा अनोखा संगम

मुंबई ग्राहक पंचायत आयोजित ग्राहक पंचायत पेठेचे आयोजन अंधेरी पूर्व येथील सिम्फनी बँक्वेट येथे २५ ते २९ सप्टेंबर २०२५ ह्या कालावधीत करण्यात आले होते. ५ दिवसाच्या ह्या पंचायत पेठेची उलाढाल रु. ८६,५७,१३०/- एव्हढी झाली. तर ह्या पेठेतील वितरण स्टॉलची उलाढाल रु. १,६१,३६०/- एव्हढी झाली. ह्या पंचायत पेठेचे उद्घाटन ज्येष्ठ कार्यकर्त्या नीलाताई म्हात्रे ह्यांचे हस्ते श्री गणेशाला पुष्पहार अर्पण करून करण्यात आले.

अंधेरी येथील पंचायत पेठ कालावधीतच 'सेतू बांधा रे!' ह्या विशेष पेठेचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक कार्यकर्त्या सुरेखा दळवी ह्यांचे हस्ते 'सेतू बांधा रे!' उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. तसेच अंधेरीच्या पेठ कालावधीत घरच्या विविध जबाबदारी सांभाळत संस्थेचे कार्य ही जोमाने पुढे नेणाऱ्या महिला कार्यकर्त्यांचा सन्मान नवदुर्गा पुरस्कार करून करण्यात आला. ह्यासाठी सुप्रसिध्द लेखिका शोभाताई नाखरे उपस्थित होत्या. अत्यंत समर्पण ओघवत्या शैलीतून शोभाताईंनी व्यक्त केले. महाराष्ट्र शासनाचे उद्योगमंत्री उदयजी सामंत यांनी अंधेरी पंचायत पेठ आणि 'सेतू बांधा रे!' उपक्रमाला भेट दिली. संस्थेचा ह्या उपक्रमांचे आयोजन समाजाला अत्यंत आवश्यक असे कार्य असून यापुढे महाराष्ट्र शासनाकडून लागणारी सर्व सहाय्य अशा उपक्रमासाठी मिळेल, अशी जाहीर ग्वाही मा. उद्योगमंत्री उदयजी सामंत यांनी दिली.

दैनिक नवशक्ती संपादक प्रकाश सावंत यांनी 'सेतू बांधा रे!' आणि पंचायत पेठेला भेट दिली. 'सेतू बांधा रे!' मधील सर्व संस्थांशी त्यांनी संवाद साधला. 'सेतू बांधा रे!' उपक्रमातील विविध संस्थांच्या स्टॉलना त्यांनी भेट दिली. त्यांचे कार्य समजून घेतले. अत्यंत आस्थेवाईकपणे घेतलेली माहिती आणि त्यावर त्यांनी दिलेला नेमक्या शब्दातला अभिप्राय ह्या उपक्रमाची यथार्थता दर्शवते. पंचायत पेठेतील 'जागो ग्राहक जागो' या स्टॉललासुध्दा मा. प्रकाश सावंत यांनी भेट दिली. शिक्षण विभाग प्रमुख मंगला गाडगीळ यांनी त्यांना संस्था राबवत असलेले ग्राहक जागृतीचे विविध उपक्रमांची माहिती दिली.



'सेतू बांधा रे' पाहून खरा पांडुरंग भेटल्याचा आनंद झाला. तुमच्या देवकार्याला मनोमन सलाम!
प्रकाश सावंत,
संपादक
दै. नवशक्ति

अंधेरी-जोगेश्वरी विभागाच्या कार्याध्यक्षा सविता दोंदे आणि ज्येष्ठ कार्यकर्त्या नीलाताई म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली अनेक नवीन कार्यकर्ते या पंचायत पेठेला कार्य करण्यास उपलब्ध झाले. पंचायत पेठ समितीचे आयोजन आणि विभागीय स्थानिक कार्यकर्त्यांच्या एकत्रित संयोगातून या दोन्ही पेठा यशस्वी झाल्या.



'बँकिंग' बद्दल बोलूया

# धनादेश वटण्यासाठी नवीन पध्दती

– अभय दातार

बिले चुकती करणे, काही कारणाने दुसऱ्यांना पैसे देणे, यासाठी आपण बहुतेक जण नवीन तंत्रज्ञानाचा, जसे की NACH, NEFT, जीपे, पेटीएम इत्यादी सुविधांचा वापर करतो. त्याचबरोबर अनेक जण धनादेश देणे पसंत करतात. धनादेश यापुढे कसे वटतील याबद्दल रिझर्व्ह बँकेने नवीन कार्यप्रणाली लागू केली आहे. त्यासंबंधीचा मेसेज सर्वांना आपापल्या मोबाईलवर आला असेल. वर्तमानपत्रांतही यासंबंधीच्या बातम्या आल्या आहेत त्या तुम्ही वाचल्या असतील. या नवीन प्रणालीविषयी आपण थोडक्यात माहिती करून घेऊया.

२००८ मध्ये रिझर्व्ह बँकेने धनादेशांची प्रतिमा घेऊन त्याद्वारे धनादेश वटवण्यासाठी अत्याधुनिक कार्यप्रणाली कार्यान्वित केली आणि ती १ फेब्रुवारी, २००८ पासून प्रायोगिक तत्त्वावर काही ठराविक शहरांत चालू केली. सर्व तांत्रिक अडचणींवर मात करून २०१० साली ही प्रणाली सर्व बँकांमध्ये लागू करण्यात आली. या प्रणालीमुळे धनादेश वटण्यास लागणार कालावधी फक्त दोन दिवसांवर आला. याचीच पुढची पायरी म्हणून रिझर्व्ह बँकेने अधिक प्रगत अशी 'सतत चालू राहणारी क्लिअरिंग व्यवस्था' लागू करण्याचा निर्णय घेतला.

**टप्प्याटप्प्याने अंमलात येणाऱ्या या प्रणालीचे स्वरूप साधारणपणे असे आहे -**

- पहिला टप्पा ४ ऑक्टोबर, २०२५ ते २ जानेवारी, २०२६ या कालावधीत कार्यान्वित होईल.

- सकाळी १० ते संध्याकाळी ४ वाजेपर्यंत जे धनादेश जमा केले जातील, त्यांची प्रतिमा तयार करून त्यावर आवश्यक ती प्रक्रिया केली जाईल.

- ज्या बँकांवर धनादेश काढला आहे, त्या बँका त्या धनादेशाची अदा करण्यासाठी 'योग्य' अथवा 'अयोग्य' अशी छाननी करतील.

- हे काम त्यांना संध्याकाळी ७ वाजायच्या आत करावे लागेल. तसे न केल्यास सदर धनादेश रक्कम अदा करण्यासाठी योग्य आहे असे समजून ती रक्कम लाभार्थीच्या खात्यात जमा करण्यात येईल.

- दुसरा टप्पा ३ जानेवारी, २०२६ पासून अंमलात येईल; आणि वरील प्रक्रियेसाठी बँकांना फक्त तीन तासांचा अवधी मिळेल. तेवढ्या वेळात ही प्रक्रिया पार न पडल्यास वरीलप्रमाणेच धनादेश रक्कम अदा करण्यासाठी योग्य आहे असे समजून ती रक्कम लाभार्थीच्या खात्यात जमा करण्यात येईल.

**आता या सगळ्यात धनादेश काढणाऱ्याची जबाबदारी कोणती? तर......**

- त्याने आपल्या खात्यात धनादेश वटण्यासाठी पुरेशी रक्कम आहे याची काळजी घेतली पाहिजे. 'धनादेश आल्यावर पाहू आणि मग रक्कम भरू', अशी मानसिकता चालणार नाही.

- या नवीन पध्दतीत हे सर्व काही इतक्या वेगाने होईल की पुरेशी शिल्लक ठेवण्याच्या बाबतीत धनादेश काढणाऱ्याने कोणताही हलगर्जीपणा दाखवू नये.

- आपल्या खात्यात पुरेशी शिल्लक आहे याची खातरजमा शक्यतो धनादेश देण्याआधीच करणे योग्य ठरेल.

ही नवीन प्रणाली पूर्णपणे संगणकीकृत असल्याने सुरुवातीस काही तांत्रिक अथवा इतर अडथळे येऊ शकतात, पण नंतर ती स्थिरावेल. धनादेश वटण्याची प्रक्रिया अधिक वेगाने होईल. एकदा का ही प्रणाली स्थिरावली, की रिझर्व्ह बँकेचे पुढचे पाऊल असेल धनादेशाचे लागलीच वटवले जाणे.



# पर्यावरणप्रिय घरगुती गणेश स्पर्धा

– रंजना मंत्री

पर्यावरणप्रिय गणेशोत्सव २०२५ अभियानाअंतर्गत दादर-माहिम-बांद्रा विभागातर्फे विभागातील सभासदांसाठी पर्यावरणप्रिय घरगुती गणेश स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. २१ सभासदांनी यात भाग घेतला. या स्पर्धेत पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून पर्यावरण तज्ज्ञ आणि ठाणे विभागाच्या अध्यक्षा डॉ. मीनल टिपणीस यांनी व सजावटीच्या दृष्टीकोनातून पुष्प रचनेतील तज्ज्ञ नंदिनी बिवलकर यांनी परीक्षण केले. तसेच दीड दिवस ते गौरी गणपतीपर्यंत वेगवेगळ्या दिवशी स्पर्धकांच्या प्रत्यक्ष घरी जाऊन निरीक्षण करण्याचे काम विभागाच्या कार्यकर्त्या माधवी आंबेकर, भुपाली वझे, अंजली बर्वे, रुजुता बेलेकर, कविता कत्रे, प्राची देशमुख, सुनंदा भोगले यांनी केले. स्पर्धकांना त्यांच्या बाप्पाचे वर्णन करून बनवलेला विडीओ विभागाकडे पाठविण्यास सांगण्यात आले होते. या विडीओजना नंबर घालून ते दोन्ही परीक्षकांना पाठविण्यात आले.


या व्हिडीओवरून व कार्यकर्त्यांच्या निरीक्षणावरून निकाल ठरविण्यात आले. दोन्हीही परीक्षकांकडून 'पर्यावरणप्रिय श्री गणेश पूजन' व 'पर्यावरणप्रिय श्री गणेश सजावट' असे वेगळे वेगळे तीन नंबर काढण्यात आले. हे निकाल संकष्टीच्या दिवशी म्हणजे १० ऑक्टोबर रोजी दुपारी ३:३० ते ५:३० या वेळेत कार्यक्रम आयोजित करून जाहीर करण्यात आले. यासाठी दादर पश्चिम येथे मकरंद सभागृह घेण्यात आला होता. या कार्यक्रमाच्यावेळी स्पर्धकांनी स्पर्धेत भाग घेतलेल्याचा अनुभव मोकळेपणी बोलून दाखवला. कार्यकर्त्यांनीही निरीक्षक म्हणून त्यांचे अनुभव सांगितले व परीक्षकांनी त्यांनी परीक्षणासाठी लावलेले निकष कोणते होते हे सांगितले. डॉ. मिनल टिपणीस यांनी पर्यावरणाबाबत नेहमीच आपण कसे जागरूक असायला हवे याचे छान मार्गदर्शन केले. विभाग अध्यक्षा डॉ. मानसीताई राजाध्यक्ष यांनी शेवटी अध्यक्षीय भाषण करून स्पर्धेचा आढावा घेत सर्वांचे अभिनंदन केले. विभाग समिती सदस्य अनघा आचरेकर यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले. सर्व स्पर्धकांना सहभागाबद्दल सर्टिफिकेट्स व विजेत्यांना ट्रॉफी देण्यात आल्या. हा कार्यक्रम अतिशय मोकळ्या आणि आनंदी वातावरणात पार पडला.



**'पर्यावरणप्रिय श्री गणेश पूजन'**
प्रथम क्रमांक- बिंदी गिरीश पटवर्धन, द्वितीय क्रमांक- वीणा वसंत भिडे, तृतीय क्रमांक- चारुता देवेंद्र सहस्रबुध्दे

**'पर्यावरणप्रिय श्री गणेश सजावट'**
प्रथम क्रमांक- चारुता देवेंद्र सहस्रबुध्दे, द्वितीय क्रमांक- नुतन सिध्देश कारेकर, तृतीय क्रमांक- अनया अभिजीत दळवी, स्वाती सुरेंद्र दिघास्कर

वाचू आनंदे




## 'जर-तर'च्या गोष्टी भाग-१

**लेखक:** डॉ. बाळ फोंडके | सकाळ प्रकाशन

**मूल्य:** ₹२५०/- **वाटपातील किंमत:** ₹१८०/-

वैज्ञानिक दृष्टीकोन रुजवण्याचा जणू वसा घेऊन, सामान्य वाचकांना सहज आकलन होईल अशा सुगम शैलीत, गेली काही दशके लेखन करणारे प्रथितयश वैज्ञानिक डॉ. बाळ फोंडके यांचे पुस्तक आपल्या सदस्यांसाठी. नावापासूनच मनोवेधक असणारे आणि कुतूहल शमविताना मार्गदर्शन करणारे अनेक लेख इथे वाचायला मिळतील.

निसर्ग, विज्ञान-तंत्रज्ञान, आरोग्य, खगोल आणि गृहविज्ञान अशा चार भागांत विभागलेल्या या पुस्तकातील कोणतेही पान उघडून वाचले, तरी विविध घडामोडी आणि क्रिया-प्रतिक्रिया यांची उकल आपणास चकित करेल. नित्य परिचयाने माहित असणाऱ्या घटीतांमागाची तर्क-संगत कारणमीमांसा कळून येईल. उदा. 'दाताखाली मिरची आली तर...!' काय होतं त्याचा अनुभव बहुतेकांना असतो. पण जे होत ते तसंच का होतं आणि पाणी पिण्याऐवजी तूप खाल्ल्याने तोंडाची आग का शमते, हे छान समजेल, या पुस्तकातून. 'बुरशी आलेला पाव खाल्ला तर...!', 'साखर निगोड असेल तर...!' इथपासून ते 'हवेतला ऑक्सिजन संपून गेला तर...!' या व अशासारख्या आपल्या जगण्याशी निगडीत अनेक मुद्यांची, प्रश्नांची उकल वाचताना आपण समृध्द होत जातो.

'एकूणच इतक्या विविध विषयांना कवेत घेऊन वैज्ञानिक माहितीचा खजिना खुला केला आहे की लेखांची केवळ शीर्षकेच पुरेशी ठरवीत. जसे - काळ उलट फिरला तर...!, गणितच अस्तित्वात नसत तर...!, अंतराळात गोळी झाडली तर...!, बस लागली तर....! सावली हरवली तर...!, हार्ट फेल्युअर झालं तर...!, पृथ्वीच्या गिरकीचा वेग वाढला तर...!

प्रत्येक घरात असावे, असे हे पुस्तक भेट द्यायलाही छान आहे.

– **वसुंधरा देवधर**



# स्वयंपाकाची भांडी आणि आजीची आठवण !!

– श्वेता लोटलीकर, लक्झरिया संघ

सप्टेंबर महिन्याच्या सामानात आलेली अरिस्टो कंपनीची तीन पातेली पाहिली आणि ती जाड आणि रुंद काठांची, ठसठशीत बुडाची पातेली पाहून आजीची आठवण आली. माझ्या आजीचा जीव कायम तिच्या घरातल्या भांड्यांमध्ये अडकलेला असायचा. 'तिची भांडी आणि ती' हे वेगळंच समीकरण होतं. जीवापाड जपायची ती त्यांना! अनेकदा तर जुने कपडे देऊन त्या बदल्यात भांडी घ्यायची ती. एक एक भांडं विचारपूर्वक तोलून मापून घेतलेलं असायचं. आज 'ग्राहक'च्या सामानात आलेली ही पातेली तिने बघितली असती तर आकाशच ठेंगणं झालं असतं तिला!! खरंच ही पातेली बघितल्यावर त्यांना छान टेबलवर मांडून फोटो काढल्याशिवाय राहावलंच नाही. चमकदार पोत, नीटस रुंदी, जाडसर काठ आणि उठून दिसणारे बूड...सर्व काही एकदम आकर्षक आणि संतुलित!! ... आणि याच सौन्दर्यात भर घालण्यासाठी व्यवस्थित मापाच्या आणि सुरेख अशा झाकणरुपी ताटल्या! ...हो आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे किंमतही अगदी रास्त... आहाहा!

आपण स्वतः दुकानात जाऊन एखादं भांडं नीट बघून, हाताळून, मोजून-मापून विकत घेतो तेव्हा मिळणारं समाधान खास असतंच, पण कधी कधी फक्त चित्र बघून आणि माहिती वाचून आपण अशी भांडी घ्यायची ठरवतो आणि मग जेव्हा ती भांडी प्रत्यक्षात समोर येतात आणि आपल्या अपेक्षेपेक्षा जास्त सुंदर निघतात- तेव्हा होणारा आनंद काही औरच असतो. अगदी तसाच अनुभव आज मला मिळाला. आणि मग जेव्हा विचार केला तेव्हा लक्षात आलं की आजकाल या use and throw च्या जमान्यात आपण किती छोट्या छोट्या आनंदांना मुकत आहोत. व्यवस्थित नियोजन करून एक एक करत आपल्या संसाराला उपयोगी पडतील अशी छान भांडी घ्यायची, एखादा छान मुहूर्त बघून ती वापरायला काढायची, त्या भांड्यांना जीव लावायचा आणि वर्षानुवर्षं ती जीवापाड जपायची. घरातले जुने कपडे देऊन त्याबदल्यात आवश्यक असणारं एखादं भांडं मिळवायचं आणि त्याचाही आनंद साजरा करायचा. खरंच गेले ते दिवस आणि राहिल्या त्या गोड आठवणी!

मंडळी, आज या पातेल्यांच्या निमित्ताने मिळालेला आनंद मला थेट माझ्या बालपणात आणि माझ्या आजीच्या रमणीय आठवणींत घेऊन गेला आणि हा अनुभव शक्य झाला तो फक्त मुंबई ग्राहक पंचायतीमुळे. कारण याच 'ग्राहक'चे सभासदत्व मला असे असंख्य छोट्या छोट्या आनंदांचे क्षण सातत्याने मिळवून देतं आणि मग आपण आजही आपल्या संस्कारांशी, आपल्या मुळांशी जोडलेले आहोत याचं एक वेगळं समाधान मिळवून देतं. म्हणून नेहमी असं वाटतं की आपल्या मुळांशी घट्ट नातं जोडणाऱ्या, खऱ्या अर्थानं ग्राहक हिताची जपणूक करणाऱ्या मुंबई ग्राहक पंचायतीचं महत्त्व अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचायला हवं आणि नवी पिढी, तरुण मंडळी उत्साहानं या संस्थेशी जोडली जायला हवीत. अर्थातच हे घडून यावं यासाठी मी काय करू शकते याचा विचार करायचा आणि त्याप्रती नक्की पावलं उचलायची, असा मी ठाम निर्धार केलाय.

## व्हॉटसअप साठी देशी पर्याय Arattai

चेन्नईच्या 'झोहो कॉर्पोरेशन'ने विकसित केलेले 'अरट्टाई' Arattai हे सोपे, 'मेड इन इंडिया', फ्री मेसेजिंग ॲप आहे. हा व्हॉटसअपसाठी स्वदेशी पर्याय आहे. **Google Play Store किंवा Apple App Store वर Arattai मेसेंजर (झोहो कॉर्पोरेशन) शोधून, ते इन्स्टॉल करू शकता.** 'अरट्टाई' या तमिळ शब्दाचा अर्थ 'गप्पाटप्पा'. 'व्हॉट्सॲप' प्रमाणेच 'अरट्टाई' वापरकर्त्यांना टेक्स्ट आणि व्हॉइस मेसेजेस पाठवता येतात. व्हॉइस आणि व्हिडिओ कॉल्स, फोटो, व्हिडिओ आणि डॉक्युमेंट्स शेअर करता येतात. ग्रुप्स (Groups) आणि चॅनल्स (Channels) तयार करता येतात. २६ ऑक्टोबरला झालेल्या आपल्या संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत आपले अध्यक्ष डॉ. बाळ फोंडके यांनी स्वतः हे आवाहन केले आहे, की संवादासाठी, चॅटिंगसाठी आता चांगला भारतीय पर्याय उपलब्ध आहे, तो वापरा.




**'अरट्टाई' ॲप आपल्या ॲन्ड्रॉइड फोनमध्ये डाउनलोड करण्यासाठी QR कोड स्कॅन करा.**

## ग्राहक संरक्षण परिषदा

केंद्र सरकारने नवा ग्राहक संरक्षण कायदा आल्यापासून केंद्रीय ग्राहक संरक्षण परिषद स्थापन न केल्याने ग्राहक व्यवहार मंत्री आणि सचिव यांना आपल्या संस्थेतर्फे १ ऑक्टोबर २०२५ रोजी पत्र पाठवून येत्या ग्राहक दिनापर्यंत (२४ डिसेंबरपर्यंत) ही परिषद गठीत करून त्याची पहिली बैठक घेण्यात यावी, अशी मागणी आपण केली आहे. तसेच सर्व राज्यांत राज्य आणि जिल्हा स्तरावर या परिषदा स्थापन झाल्या आहेत की नाही याबद्दल सविस्तर माहितीसुध्दा आपण मागवली आहे. ग्राहकांना वेळेत न्याय मिळण्यासाठी या परिषदा असणे आवश्यक आहे.

## कफ सिरप दुर्घटना

मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये कफ सिरप दुर्घटनेत २४ बालकांचा मृत्यू झाल्याच्या पार्श्वभूमीवर आपण केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाच्या प्रमुख आयुक्त निधी खरे यांजकडे ८ ऑक्टोबर २०२५ रोजी पत्र पाठवून याप्रकरणी ग्राहकांच्या सुरक्षिततेच्या अधिकाराला गंभीर बाधा येत असल्याने त्वरीत हस्तक्षेप करण्याची विनंती केली असून धोकादायक अशा या कफ सिरपचे साठे गोठवून त्याच्या विक्रीवर राष्ट्रीय स्तरावर बंदी आणावी तसेच मृत्युमुखी पडलेल्या बालकांच्या कुटुंबांना नुकसान भरपाई देण्यासाठी राष्ट्रीय आयोग तक्रार दाखल करावी, अशी मागणी आपण केली आहे.

## कॉलेज विद्यार्थ्यांसाठी वेष्टण वाचन

सोमवार दि. ६ ऑक्टोबर रोजी कांदिवली पश्चिम येथील केईएस श्री विठ्ठलदास संघवी ज्युनियर कॉलेज येथे विद्यार्थ्यांसाठी एक कार्यशाळा घेण्यात आली. कॉलेजला रोजच्या जीवनात उपयोगी पडणाऱ्या माहितीची अपेक्षा असल्याने वेष्टण वाचन आणि जाहिरातीतून होणारी फसवणूक या विषयांवरील प्रेझेंटेशन दाखवण्यात आले.



वेष्टण वाचन विषयक वेष्टणांवरील कायद्याने आवश्यक माहिती, दर्जा आणि सुरक्षितता दर्शवणारी निरनिराळी बोधचिन्हे, आयात वस्तूंच्या वेष्टणांवरील माहिती तसेच इतर महत्त्वाची माहिती देण्यात आली. काही वेष्टणे तिथे मांडून ठेवण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी त्यांचे अवलोकन केले आणि नीट समजून घेतले. हा कार्यक्रम सादर करण्यासाठी मंगला गाडगीळ आणि नेहा जोशी या दोघीजणी गेल्या होत्या. कॉलेजच्या प्रिन्सिपॉल रागी नाम्बियार यांनी कार्यक्रम अतिशय उत्तम आणि उपयोगी असल्याचे सांगितले.



## ग्राहक पंचायत पेठ दापोली

गेली १२ वर्षे दापोली येथे दरवर्षी संस्थेतर्फे आयोजित होणारी मुंबई ग्राहक पंचायत पेठ काही अपरिहार्य कारणांमुळे नाईलाजास्तव यंदा रद्द करण्यात येत आहे. दापोलीतील चोखंदळ ग्राहकांच्या होणाऱ्या गैरसोयीबद्दल आम्ही दिलगीर आहोत.

**– अनुराधा देशपांडे**
**अध्यक्ष-पंचायत पेठ समिती**

## पर्यटनस्थळावरील उपकर



पर्यटन हे आपल्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी एक आवश्यक साधन आहे. पर्यटनावर कितीतरी व्यवसाय, व्यक्ती अवलंबून असतात. आपण पर्यटनासाठी विविध हॉटेल्स वापरतो, प्रवासासाठी गाडी किंवा क्रूझ वापरतो, अभयारण्यात जातो. प्रत्येक ठिकाणची जैवविविधता जपण्यासाठी आणि वातावरणातील बदलात सुसूत्रता राखण्यासाठी काही विशिष्ट वाढीव रक्कम कराच्या रुपात द्यावी लागते आणि आता ते अपरिहार्य झालंय.


२०२३ च्या ऑगस्ट महिन्यात हवाई बेटांवर शुष्क जंगलांना आगीने वेढले. परिणामस्वरूप १०२ जणांनी प्राण गमावले, तर सुमारे २००० इमारतींचे नुकसान झाले वातावरण बदलाचा परिणाम ठरलेले ते अमेरिकेतील एक ठिकाण ठरले. या वर्षी मे महिन्यात 'हवाई'च्या प्रशासनाने एक महत्त्वपूर्ण पण दूरगामी निर्णय घेतला. पर्यटकांकडून ग्रीन टॅक्स या नावाने कर वसूल करण्यास सुरुवात केली. याच प्रकारे बाली, मालदीव, मेकॅनोस किंवा सँटोरिनी बेटांवर कर घेतला जातो.

बुकिंग डॉट कॉम ने २०२४ मध्ये केलेल्या एका सर्वेक्षणानुसार ७५% जागतिक पर्यटक असे उपकर देण्यास आनंदाने तयार असतात. जागतिक पर्यटक उपकर देण्यास राजी असतात फक्त तो पर्यटकांच्या आवाक्यात हवा. शिवाय या वसुलीत पारदर्शकता हवी. या अनुषंगाने ग्रीन टॅक्स रिपोर्ट प्रकाशित व्हायला हवेत. पर्यटनाच्या निमित्ताने आपल्याकडून नकळत पर्यावरणाची हानी होते. एक प्रकारे हे पातकच. हा कर देणे म्हणजे या पातकाची भरपाई त्याला पर्यटकांनी तयार असावे.

## केसरी टूर्स – सुनावणी प्रलंबित

करोना काळातील रद्द झालेल्या सहलींचा परतावा देण्याबाबत केसरी टूर्स विरोधात दिल्ली उच्च न्यायालयात २५ सप्टेंबर रोजी नियोजित असलेली सुनावणी कोणतेही युक्तिवाद न होता २७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. संस्थेतर्फे ॲड. शिरीष देशपांडे या प्रकरणी ऑनलाईन उपस्थित होते.

## ऑनलाईन गेमिंगला कायद्याची वेसण



२० ऑगस्ट रोजी 'ऑनलाईन गेमिंग- प्रोत्साहन आणि नियमन २०२५' हे विधेयक लोकसभेत मंजूर करण्यात आले. ई स्पोर्ट्स, आणि ऑनलाईन सोशल गेम्सना प्रोत्साहन देणे पण गेम्स संबंधी सेवा, जाहिराती आणि आर्थिक व्यवहारांवर पूर्णपणे बंदी घालणे हे या विधेयकाचे वैशिष्ठ्य म्हणता येईल. या कायद्यानुसार ऑनलाईन मनी गेम ऑफर केल्यास किंवा चालवल्यास तीन वर्षापर्यंत तुरुंगवास आणि/किंवा एक कोटी पर्यंत दंड होऊ शकतो. जाहिराती संबंधित उल्लंघन केल्यास दोन वर्षापर्यंत तुरुंवास आणि/किंवा ५० लाखांपर्यंत दंड होऊ शकतो. असे गुन्हे दखलपात्र आणि अजामीनपात्र असतील.

ऑनलाईन गेम्सचे तीन भाग पडतात. पहिला म्हणजे धोरणात्मक विचार, टीमवर्क, आणि सांस्कृतिक देवाण घेवाण समाविष्ट असणारे, दुसऱ्या प्रकारात सॉलिटेअर, सुडोकू किंवा बुध्दिबळ यासारखे मनोरंजक खेळ समाविष्ट असतात. तिसरा प्रकार मात्र संपूर्ण समाजासाठी गंभीर आहे. कारण यात कुटुंबेच्या कुटुंबे उद्ध्वस्त होतात. दरवर्षी देशातील ४५ कोटी लोक तब्बल २० हजार कोटींचा चुराडा करतात आणि कंगाल होतात. अशा गेम्सपायी आर्थिक नुकसानाबरोबरच व्यसनाधीनता, फसवणूक आणि दहशदवादही वाढीला लागला आहे.

या विधेयकामुळे पोकर, रमी, पत्ते त्याचप्रमाणे काल्पनिक गेम्स बेकायदा ठरवले गेले आहेत. क्रिकेटपटू, सिनेमातील नट-नट्या या सारख्या सेलेब्रिटी अशा गेम्सच्या जाहिरात करत असतात. त्यामुळे ड्रीम ११, गेम्स २४ बाय ७, रमी सर्कल सारख्या गेम्समध्ये लोकांमध्ये विशेषतः तरुणाईमध्ये प्रचंड रस आणि कुतूहल निर्माण होते. काही खेळांमध्ये पैशावर आधारित पैजा लावल्या जातात. यातच त्यांचे नुकसान होते म्हणूनच हे विधेयक महत्त्वाचे.

# आम्ही सजग बाल ग्राहक!

- श्रेया सहस्रबुध्दे

***गेल्या वर्षी पुणे येथील ग्राहक पंचायत पेठेत आपल्या 'जागो ग्राहक' हा स्टॉल काही मुलांनी छान चालवला. त्यांचा धमाल अनुभव वाचा. आणि यंदा तुम्हीही सहभागी व्हा!***

संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त मुंबई ग्राहक पंचायत, शिक्षण विभाग यांनी पुणे येथे एक बाल ग्राहक शिबिर मागील वर्षी घेतले होते. त्यात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांशी आम्ही संवाद साधला.



त्यांना शिबिराचा काय उपयोग झाला याविषयी मुले म्हणतात, बघा-

शार्दुल : माझ्या नववी पर्यंतच्या शालेय जीवनात 'ग्राहक' या विषयावर शिबिर असतं असं मी प्रथमच ऐकलं.. एक उत्सुकता म्हणून आईने नाव नोंदणी केली.

दिशाभूल करणारी जाहिरात, सायबर फसवणूक कशी टाळावी, BIS app वर कोणत्याही कंपनीची माहिती कशी मिळवावी, असे खूप काही समजले.

पंचायत पेठेत 'जागो ग्राहक जागो' चार स्टॉलमुळे माझ्या अनुभवात भर पडली. हे सर्व खूप interesting आहे.

स्वरा : उत्पादनाच्या वेष्टणावर असलेली विविध चिन्हे मला शिबिरात समजली.

घरात आणलेल्या सर्व नवीन वस्तूंचे वेष्टण नीट बारकाईने वाचायची मला सवयच लागली आहे.. खरंच!!खूप मजा येते!!

कल्याण : शिबिरामुळे जाहिरातींकडे पण पाहण्याचा माझा दृष्टिकोन बदलला आहे.

जाहिरात योग्य आहे की उत्पादनाबाबत अवास्तव दावे जाहिरातीमध्ये केले आहेत याचा सारासार विचार मी आता करू लागलो आहे.

अस्मी : पंचायत पेठेत 'जागो ग्राहक जागो'च्या स्टॉलवर मी होते आणि मला समजलं की चक्क काही मोठ्या व्यक्तींनाही या विषयाबद्दल माहिती नाही!!

बाल ग्राहक शिबिरामुळे आम्ही सजगतेची पहिली पायरी चढलो याचा मनोमन आनंद वाटला!

मागील वर्षी आपण पुण्यातील 'जागो ग्राहक जागो'चा स्टॉल अभिनव कल्पकतेने सजवला, सायकल ठेवून सेल्फी पॉईंट तयार केला, शाश्वत जीवनशैलीचे प्रतीक असलेल्या फुलपाखरावर पेठेत आलेल्या ग्राहकांचे अभिप्राय घेतले! किती मजा आली होती ना हे सर्व करताना!! बालमित्र-मैत्रिणींनो या वर्षी देखील आपण पुण्यामध्ये बालग्राहक शिबिर घेणार आहोत!

आता यावर्षी नवीन काय करूया बरं!! आम्हा कार्यकर्त्यांच्या मनात नवनवीन कल्पना आहेत! तुम्हाला भेटून आमचा उत्साह आणि ऊर्जा अधिक वाढणार आहे! नेहा जोशी व मंगलाताई गाडगीळ आपल्याला मार्गदर्शन करणार आहेत. शिबिरामध्ये आपण सगळे Wrapper reading शिकणार आहोत, Quiz खेळणार आहोत, advertisement वरती चर्चा असेल, असली, नकली उत्पादने प्रत्यक्ष पहाणार आहोत आणि बरंच बरंच काही!!

चला तर मग, शिबिरामध्ये शिकूया सजग ग्राहक होऊया पंचायत पेठेमध्ये काही योगदान देऊया!



बाल ग्राहक शिबिरासाठी नोंदणी करा. तुमच्या शाळेतील सोसायटीतील दोस्त मंडळींना, मित्रांना शिबिरासाठी घेऊन या.

आजचे बाल ग्राहक उद्याचे जबाबदार नागरिक होणार आहेत! बरोबर ना!


**पुण्यातील बालग्राहक शिबीर- नावनोंदणीसाठी संपर्क**

१. कल्पिता रानडे, कार्यवाह, पुणे वितरण, मो. ८६००१३०२०७

२. श्रेया सहस्रबुध्दे, समिती सदस्य, पुणे वितरण, मो. ८२७५०६६०८३

• POSTAL REGISTRATION NO. MCN/158/2023-2025 • WPP LICENSE NO. MR/TECH/WPP-137/NORTH/2023-2025
• LICENSE TO POST WITHOUT PREPAYMENT, ON 5TH & 6TH • VILE PARLE (W) P.O. MUMBAI - 400 056

RNI NO. MAHBIL/2011/39044






अंध उद्योजक सागर पाटील याच्या प्रकाशमय दालनाला भेट देताना उद्योगमंत्री उदय सामंत



महाराष्ट्र राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री उदयजी सामंत यांची आपल्या संस्थेच्या ग्राहक शिक्षण दालनाला भेट



बोरीवली पेठेचे उद्घाटन आमदार अतुल भातखळकर यांच्या हस्ते झाले. त्यांचे स्वागत करतांना बोरीवली विभागाच्या अध्यक्ष प्रा. सुहासिनी संत




प्रसिध्द निवेदिका व शिक्षिका शोभा नाखरे यांचे मंत्रमुग्ध करणारे भाषण. व्यासपीठावर - अनुराधा देशपांडे, प्रभाकर गवाणे, ॲड. शिरीष देशपांडे, संजीव मंत्री



ज्येष्ठ समाजसेविका ॲड. सुरेखा दळवी यांच्या हस्ते 'सेतू बांधा रे!' या विशेष पेठेचे उद्घाटन झाले



ॲड. सुरेखा दळवी पेठेतील उद्योजकांची माहिती करून घेताना